ग्रंथाली वाचक चळवळीचे
# रुची
डिसेंबर २०११ • मूल्य १० रुपये

## कथा नृसिंह अवताराच्या मूळ स्थानाची!

प्रभाकर भिडे




शांताराम : व्यक्ती आणि वाङ्मय या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात दिनकर गांगल, के.ज. पुरोहित (शांताराम), शंकर वैद्य, विलास खोले, आणि लेखिका सुरेखा सबनीस




'ओंजळ काव्यफुलांची' पुस्तकाचे प्रकाशन.
समारंभात विनायक गोखले, राजाभाऊ मांजवकर, दत्ताभाऊ दिवेकर, कवी सुभाषचंद्र मयेकर, संगीतकार यशवंत देव, डॉ. अनंत कळसे, मधु चव्हाण व आमदार प्रमोद जठार

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# रुची

**डिसेंबर २०११, वर्ष ३१ वे,**
**अंक अकरावा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**
**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ.'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर(प), मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.

मिळालेल्या 'जिंदगी का साथ' निभावून देव(आनंद) अंतर्धान पावला. जगावं कसं, कण्हत कण्हत की गाणं म्हणत, या प्रश्नाचं उत्तर देऊन गेला. तोही काही श्रीमंत घरातून आला नव्हता, तरी सकारात्मक विचार घेऊन आला होता आणि जाईपर्यंत सकारात्मकच राहिला. अशा व्यक्ती अवती-भवतीही असतात, पण आपणच इतके उबगलेले असतो, की अशा सहज जगण्याचं भानच येत नाही.

हे भान विविध व्यक्तींच्या अभिव्यक्तीवाचनातून येतं. दिवाळी अंकाचा विषय तसाच जमला होता. त्यानंतरचा हा अंक, नेहमीची काही सदरं घेऊन येतोय. प्राचार्य मदन धनकर दर अंकात एकेका कर्तृत्ववानाची नोंद घेत आहेत. लंडनच्या 'द गार्डियन' या वृत्तपत्रानं जगातल्या शंभर कर्तृत्ववानांची नोंद केली त्यात चंद्रपूरच्या तरुण ॲड. जयश्री सातपुते यांचा समावेश आहे. त्यांच्या कार्याची ओळख धनकरसरांनी करून दिली आहे. थिंक महाराष्ट्र डॉट कॉम या वेबपोर्टवरील निवडक एक वा दोन लेख 'रुची'त दर महिन्याला प्रकाशित केले जातात. त्या मालिकेतील संतोष गवळे यांचा लेख या अंकात आहे. प्रवीण बर्दापूरकरांनी दिवाळी अंकात कवी ग्रेस यांचं व्यक्तित्व उभं केलं. तशाच सहजशैलीत ते वाशिम येथे होणाऱ्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवडून आलेल्या नारायण कुलकर्णी-कवठेकर या मनस्वी कवीशी असलेलं मैत्र सांगत आहेत. 'विकीपिडिया'वर नोंदवायची माहिती व त्यात लेखन, संपादन, मुद्रितशोधन करत ती अद्ययावत करत राहण्यासाठी असलेल्या संधीबाबत मेधा कुलकर्णी यांनी केलेलं आवाहन काळाचं भान देणारं आहे. मराठी संवर्धनाबाबत आणि भविष्याबाबत आस्था असणाऱ्यांना मराठीप्रेमींना विचार करायला लावणारं आहे.

२५ डिसेंबरच्या वाचकदिनाची तयारी सुरू आहे. दिवस राखावा ही विनंती.

**– संपादक**

# कवठेकर-कुळकर्ण्यांचे नारायणपंत !

## प्रवीण बर्दापूरकर

नारायण कुळकर्णी-कवठेकर यांची वाशीम येथे होणाऱ्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड, ही बातमी वाचल्यावर मनात काही आनंदाची कारंजी थुईथुई नाचू लागली नाहीत, की आठवणीच्या पक्ष्यांनी मनाभोवती फेर धरला नाही. एक तर, बातमी बहुप्रतीक्षित होती, हे कधी ना कधी घडणारच होतं. खरं तर यापेक्षाही मोठे सन्मान नारायणकडे चालत येणार याची खात्री साडेतीनपेक्षा जास्त दशकांपासून नारायणच्या कवितेवर प्रेम करणाऱ्या, त्या अस्सल प्रतिभेचे चाहते असणारांना होती. आम्हा मित्रांना तर तो ठाम विश्वासच होता. ही निवड होण्याआधी रंगलेल्या राजकारणापासून ते झालेल्या विरोधापर्यंत सर्वच बाबी मला ठाऊक आहेत. अखेर या संमेलनाचे आयोजक असलेल्या वाशिमकरांनी दिलेला जमालगोटाही मला चांगला ठाऊक आहेत. या सर्व हालचाली मी एन्जॉय करत होतो, कारण नारायणमध्ये असणारी अस्सल प्रतिभा, विरोधी खुज्या वृत्तीवर काहीही भाष्य न करता मात करणार याची खात्री होती आणि घडलंही तसंच! दुसरं म्हणजे आमची मैत्री कवितेपलीकडची आहे. माणूस आणि कर्तृत्व या दोन्ही पातळीवर तो बहरणार, डेरेदार होणार, कर्तृत्वाच्या त्याच्या पारंब्या स्तंभित आणि लुब्धही करणार हे आम्हा मित्रांच्या वर्तुळात गृहीतच होते. हे गृहीत असणं आमच्या मैत्रीचा बळकट धागा आहे. एकमेकाविषयी गाढ विश्वास, इतरांना कधीच न दिसणारी समंजस, घनदाट आणि एकमेकाच्या मनात खोलखोल रुजलेली ही मैत्री; पक्वतेकडे झुकत आता प्रौढ झालेली



**नारायण कुळकर्णी-कवठेकर**

आहे. या रुजण्याला सुरुवात झाली ती सत्तरीच्या दशकाच्या सुरुवातीला आणि आजअखेर ते रुजणे सुरूच आहे. रुजण्याची जी प्रक्रिया इतकी प्रदीर्घ असते, तिला फक्त सात्त्विक विश्वासाचीच फळं येत असतात. तो विश्वास कायम आश्वासक, उबदार असतो आणि सावलीसारखा सोबत असतो, तो इतरांना दिसत नाही. मात्र या मैत्रीत केवळ सात्विकपण नसतं तर दुसऱ्या पातळीवर अशी मैत्री भर्राट असते आणि तिचा वेगही विलक्षण असतो.

नारायणशी ओळख झाली तेव्हा तो एम.ए.च्या पहिल्या वर्षाला होता आणि नागपूरला होता. प्रकाश देशपांडे, अक्षय-कुमार काळे, रमेश अंधारे वगैरे त्याच्या एक वर्ष पुढे होते. या सर्वांत खूप सख्य होते आणि या सर्वांची 'ग्रेस' नावाच्या अद्भुत कवीशी मैत्री होती. तेव्हा नारायणचा एक पाय कायम कवठा या गावात असे. कवठा हे नारायण-पंताचे मूळ आणि जन्मगाव. तेव्हा हे गाव वाशीम तालुक्यात होते. वाशीम जिल्हा होण्याआधीच तो काळ होता. आजवरच्या आमच्या मैत्रीत एकमेकाच्या लेखनाविषयी चकार शब्द न उच्चारण्याचा संकेत आम्ही पाळला आहे. ना कौतुकाचा, ना समर्थ-नाचा, ना टीकेचा; आज पहिल्यांदा सांगतो...

नारायणपंतांचे कवितेच्या प्रांतात नगारे तेव्हाच वाजू लागले होते, झेंडे फडकायला सुरुवात झाली होती. एम.ए.च्या पहिल्या वर्षाला असताना नारायणपंतांच्या कविता 'सत्यकथा'त प्रकाशित व्हायला सुरुवात झालेली होती. सत्यकथात कविता प्रकाशित होणं म्हणजे तेव्हा मराठीत नोबेलपेक्षाही जास्त मानाचं होतं आणि नारायणपंताच्या तर एकाच वेळी पाच-पाच कविता प्रकाशित होत! नारायणपंताच्या कविता सत्यकथात प्रकाशित झाल्याची वार्ता तेव्हा दस्तूरखुद्द प्राध्यापक वर्गात देत ! नारायणपंत कुळकर्णी-कवठेकर हे केवढं मोठ्ठं प्रस्थ त्यावेळी होतं हे लक्षात यावं. यातही आणखी एक गंमत होती; नारायणपंतांच्या कुळात तोवर कोणी लेखक-कवी निपजला नव्हता, नारायणपंत हे पहिले!! त्यामुळे कोणत्याही लेखकाच्या प्रारंभीच्या लेखनाच्या काळात, त्याच्यावर असणारा प्रभाव नारायणपंतांच्या कवितेवर नव्हता. ती अस्सल नवी होती. मराठी कवितेला क्रांतीचे जोरदार धुमारे फुटल्याचे ते दिवस असताना नारायणपंतांची कविता मात्र खेडे, खेड्यातली स्त्री- तिचं भावजीवन, ग्रामीण राजकारण अशा वास्तवाला भिडलेली होती. 'नंदीबैल' ही त्या काळातली नारायणपंताची कविता या

भेदकतेचं जळजळीत उदाहरण आहे. आधी सत्यकथेत आणि मग 'महाराष्ट्र टाइम्स'च्या दिवाळी अंकात ही कविता प्रकाशित झालेली आहे. प्रकाशनाआधीच ही कविता नारायणपंत अशी काही गाऊन सादर करत, की मनाला थेट भिडत असे ती. नारायणपंताची एक कविता 'मुली' मला विलक्षण भावली. स्त्री मुक्तीवरचं एवढं संयत तरीही परखड आणि थेट वास्तवाला बेदरकार धाडसानं भिडणारं भाष्य, मला आजवर अनुभवायला मिळालं नाहीये...

*मुली म्हणजे चुलीचे खाद्य*
*उंबरठ्याच्या कैदी*
*वटवृक्षाच्या वेठबिगार*

ऐन उमेदीच्या काळात नारायण-पंताच्या कवितेला, चोखंदळ वाचकांनी पसंतीच्या कोंदणात विराजमान केलं, ते त्या कवितेतील बावनकशी प्रतिभेनं गारुड केल्यानंच. समीक्षकांनी शिक्कामोर्तब करताना त्यातील प्रतिमांचे सामाजिक संदर्भ सांगितले. 'कविता दशकाची'सारख्या प्रकल्पात नारायणपंतांची कविता शीर्षस्थानी झळकली, हा केवढा मोठा बहुमान होता. 'ग्रंथाली'चा तो महत्त्वाकांक्षी प्रकल्प होता. ज्या कवीचं एकही पुस्तक प्रकाशित झालेलं नाही पण ज्याची कविता अस्सल, कसदार आहे, वेगळी प्रतिमासृष्टी उभी करत, वास्तवाला घनगर्भ आशयानं जळजळीतपणे भिडते आहे, अशा मराठीतील दहा कवींचा शोध मंगेश पाडगांवकर, दया पवार यांसारख्या बुजुर्ग आणि मराठी कवितेवर प्रतिभेची मोहोर उमटवणाऱ्यांनी घेतला. त्यात नारायणपंतांची कविता विराजमान झाली. लेखनाच्या प्रारंभीच्या काळात कानात वारं आणि डोक्यात नशा शिरायला हे पुरेसं होतं. त्या यशातून लोकप्रियतेच्या आमिषाच्या आहारी जाण्याचा धोका होता. पण, त्या यशाच्या मुसक्या बांधून, नारायणपंत कवितेच्या वाटेवर अव्यभिचारी निष्ठा कवटाळत चालत राहिले. खरं तर कविता हा नारायणपंतांचा श्वास आणि निश्वासही आहे. हे असं कायम असणं सोपं नाही, त्यासाठी तळहातावर निरांजन घेऊन जगण्याची वृत्ती असावी लागते आणि ते निरांजन विझू न देण्याची साधना विलक्षण दमछाक करणारी असते. त्यानंतर त्या साधनेला आलेली फुलं साक्षात सूर्यालाही स्तंभित करणारी असतात. नारायणपंतांची कविता अशा वेगळ्या जात आणि कुळीची आहे.... अलिखित करार मोडून नारायणपंतांच्या कवितेवर प्रथमच लिहिलं. हे लिहिलं म्हणून अजून एक, एकदा सांगून टाकलंच पाहिजे, कवी नारायणपंतांमध्ये इतरांचे कौतुक जाहीरपणे करण्याचा गुण आहे. नारायणपंत आणि त्यांची कविता जसजशी प्रौढ आणि समंजस होत गेली तसतशी त्याने नवोदितांसाठी वाटाड्याची भूमिका स्वत:हून स्वीकारली. नवोदितांसाठी काव्यशाळा किंवा शिबिरं असे काही भंपक उपक्रम हाती न घेता आणि प्रेषिताची भूमिका न स्वीकारता, नवोदितांचे नारायणपंत वाटाड्या झाले. एकूणच इतरांविषयी तुच्छता बाळगणं हा आजच्या जगण्याचा मंत्र झालेला असताना इतरांशी आणि त्यातही उमेदवारी करणाऱ्यांसाठी नारायणपंतांचं असं ममत्वानं वागणं दुर्मिळ आहे. कधीकधी प्रश्न पडतो, जगण्याला कवितेचा संदर्भ नसता तर या आमच्या नारायणपंतांचं काय झालं असतं? एकूण काय तर, नारायणपंतांतून कविता वजाच होऊ शकत नाही.

मूळ मुद्यापासून खूपच भरकटलो. तर सांगत हे होतो की, एक पाय नागपुरात आणि दुसरा पाय कवठ्यात ठेवत नारायणची कविता बहरत होती. यातून वेळ काढत तो प्रेम करत होता आणि मैत्रीही निभावत होता. त्याचा प्रारंभीच्या काळातला जगण्यातला संघर्ष आणि माझी अभावग्रस्तता हा आमच्या मैत्रीतला भावनात्मक दुवा होता तरी त्याबद्दल साधा उच्चारही कधी झाला नाही. शिवाय कोणत्याही दबाव किंवा प्रलोभनाला बळी न पडणारा उद्धटपणा, हेही आमच्यातलं समान वैशिष्ट्य. मैत्रीचा दुवा बळकट असूनही आम्ही दोघं कधीच एकमेकांच्या खाजगी आणि कौटुंबिक आयुष्यात डोकावलो नाही, आमचं कधीच नियमित एकमेकाकडे जाणं-येणं नाही. कशाचीही देवाण-घेवाण-अगदी अपवाद म्हणूनही- आजवर कधीच आमच्यात झालेली नाही. असं काही करणं हा आमची मैत्रीचा सारांशच नाही. आमच्या स्वभावात उणिवा, काही अवगुण नाहीत असं नाही, माणूस असल्यानं ते आहेतच, पण मैत्रीचा सारांश स्वच्छ असल्यानं ते परस्परांचे अवगुण, स्वभावातील उणिवा आम्ही अलंकाराप्रमाणे मिरवल्या. मोबाइल येण्याआधी नियमित बोलणं होत नसं तरी आमच्यात पत्रव्यवहारही नव्हता. अनेक वर्षं नारायणच्या आणि माझ्या पत्नीची साधीशीही ओळख नव्हती. तरीही आमच्यातलं मैत्र असं काही अभेद्य आहे, की अनेकांना त्याचा मत्सर वाटतो. अनेकदा तर अनेक वर्षं आम्ही भेटत नाही आणि मग भेटलो, की असे कोसळून भेटतो आम्ही की, मधला न भेटीचा काळ पूर्णपणे पुसला जातो. आमच्यातला आणखी एक अलिखित करार म्हणजे कधीही एकमेकांशी सरळ न बोलणं! व्यासपीठ वगळता आम्ही केव्हाही, कुठेही, कसंही भेटलो आणि एक तरी सरळ वाक्य एकमेकांशी बोललो असं आजवर घडलं नाही आणि भविष्यातही घडणार नाही. कारण, असंच एकमेकांशी वागणं-बोलणं हा आमच्या मैत्रीचा प्राण आहे. आमच्या संभाषणात परस्परांची इतकी निंदा-नालस्ती असते, की अनेकदा अनेकांना आमच्या दोघातलं संभाषण ऐकणं समोरच्याला कठीण व्हावं, असह्य व्हावं... अर्थात आम्हाला त्याची जाणीव नसते आणि ती कुणी चुकूनमाकून करून दिलीच तर, आम्हाला त्याची फिकीर नसते. आमच्यात परस्परांची टिंगलटवाळी यथेच्छ असल्यानं आम्हाला इतर कोणाच्या उखाळ्यापाखाळ्या करण्याची गरजच वाटत नाही. मैत्री स्फटिकासारखी आणि खळाळती असली पाहिजे. मोजून-मापून मैत्री नाही, व्यवहार होतो यावर आम्ही ठाम आहोत. या अशा खळाळते असण्याच्या अनेक इरसाल आठवणी आमच्या पोतडीत आहेत, असो.

आज अनेकांचा विश्वास बसणार नाही पण, नारायणला चक्क राजकारणात जायचं होतं. अगदी तरुण वयातच आमचे नारायणराव रीतसर निवडणूक लढवून, कवठा ग्रामपंचायतीचे सदस्य म्हणून विजयी झाले

होते. एखाद्या मराठी कवीनं निवडणूक जिंकण्याचा भारतीय लोकशाहीतील तो पहिलाच सुवर्णक्षण असावा. ग्रामसुधारणा नावाच्या भुतानं नारायणला त्या काळात अक्षरश: झपाटून टाकलं होतं. त्याचा परिपाक म्हणजे निवडणूक जिंकण्याचा प्रताप होता! नारायणचा हा उपद्व्याप आमच्या मैत्रीला अगदी शंभर टक्के साजेसा होता आणि म्हणूनच त्याचं मित्र-परिवारात कौतुक होतं. या भुताच्या बाधेतून लवकरच नारायणची सुटका झाली आणि कवितेच्या प्रांती तो पुन्हा ठणठणीत परतला हे आपल्यासाठी खूपच चांगलं झालं. कारण ग्रामसुधारणा नावाच्या झाडाला हेकट-पणाची फळं कशी येतात, याचा अनुभव आपण घेत आहोत हे लक्षात घेता नारायण कुळकर्णी-कवठेकर नावाच्या आणखी एका अण्णाच्या तडाख्यात आपण सापडलेलो नाही, हे समाधान काय कमी आहे?


चित्रपट संगीत आणि उर्दू शेर-शायरी ही नारायणची आणखी वैशिष्ट्यं. माझ्या माहितीप्रमाणे नारायणला हिंदी चित्रपटातली कमीत कमी दोन हजार गाणी मुखोद्गत असावीत. याशिवाय मराठी गाणी वेगळी, मराठी कविता आणि उर्दू शेर-शायरी वेगळी. याबाबतीत नारायण अफाट बापू या सदरात मोडणारा अफलातून माणूस आहे. हे एवढं मोठं पाठांतर त्यानं केव्हा केलं, का केलं या प्रश्नाला उत्तर नाही. त्याचा एक फायदा असा, की मैफिल खाजगी असो की जाहीर कार्यक्रम; नारायणनं एकदा का सूत्रं हाती घेतली, की श्रोते खिळून जाणं क्रमप्राप्त असतं. अनेकदा तर ज्या कविसंमेलनाचे सूत्रसंचालन नारायण करतो तेच इतकं मंत्रमुग्ध करणारे असते, की अनेकांचं काव्यवाचन त्यासमोर फिकं पडतं! या अफाट पाठांतर आणि स्मरणशक्तीचा फायदा त्याला व्याख्यान देतानाही होतो आणि वर्गात शिकवतानाही होत असणारच. कारण, आजअखेर त्याच्या एक ही विद्यार्थ्यानं तो वाईट शिकवत असल्याची तक्रार केलेली नाही! चरितार्थासाठी नारायणनं शिक्षकाचा पेशा निवडून आता तीनेक दशकं उलटली, एवढा काळ तक्रार करायला पुरेसा आहे पण, अशी एकही तक्रार आलेली नाही, हे नारायणमधला शिक्षक प्रामाणिक तसेच गंभीर असल्याचाच पुरावा आहे. पायलीला पन्नास मिळणाऱ्या आदर्श शिक्षक पुरस्कारांपेक्षा हा पुरावा जास्त भक्कम आहे.

नारायण अकोल्यासारख्या आड-वळणाच्या गावात वास्तव्याला का आहे, हा एक चर्चेचा विषय असतो. त्यानं नुसती इच्छा जरी व्यक्त केली असती तरी कोणत्याही संस्थेत सहज चाकरी मिळाली असती. माणसं आणि मातीचा त्याला असलेला लोभ सुटत नाही हे त्याचं खरं कारण आहे. कवठा, रिसोड, वाशीम, अकोला परिसरात तो रुजला, अंकुरला आणि वाढला. कवितेचं अस्सल देणं रक्तातच आणि तेही जन्मजात असल्यानं, आपलं नाणं तो कोठून वाजवतो आहे याच्याशी साहित्य जगताला काहीच घेणं-देणं नव्हतं. आपल्या मस्तीत नारायण अकोल्यात राहतो आणि सर्वांना त्याच्यासाठी अकोल्यात यावं लागतंच. प्रतिभावान कलंदरगिरी कोठेही असो, समाज तिला सलाम कसा करतो, याचं हे एक अप्रतिम उदाहरण आहे.


आम्ही सगळे तरुण असताना, इकडे-तिकडे हुंदडून नारायण नागपूरला आला, की प्रकाश देशपांडे, सिद्धार्थ सोनटक्के वगैरे मित्रांचा एक ग्रुप जमायचा. कधी कधी सुबोध धर्माधिकारीही त्यात असायचा. दिवसरात्र मनसोक्त धुडगूस घालणं हा एक कलमी कार्यक्रम त्या काळात आमचा होत असे. प्रौढत्व आलं, या वयातही आपले बाप-काका धुडगूस घालतात याचं आश्चर्य मुलांच्या चेहऱ्यांवर स्पष्ट वाचता येण्याइतकं दिसू लागलं, आमचेही व्याप हळूहळू वाढत गेले, भेटी कमी होत गेल्या आणि तो धुडगूस थांबला. आता एकमेकांच्या कर्तबगारीच्या बातम्या वाचायला मिळतात आणि आपला मित्र कोणत्या उंचीवर पोहोचला हे लक्षात येतं. त्याच्याशी असणाऱ्या मैत्रीचा अभिमान वाटतो. तो हे शिखर पार करणारच याची आपल्याला असलेली खात्री किती सार्थ होती याचं समाधान वाटतं. म्हणूनच नारायण वाशीमला होणाऱ्या विदर्भ साहित्य संमेलनाचा अध्यक्ष म्हणून निवडला गेला याचं आम्हाला अप्रूप वाटलं नाही; ही घटना त्याची भविष्यात आणखी मोठ्या सन्मानासाठी निवड होणार असल्याची चाहूल आहे, नांदी आहे असंच वाटलं.

नारायण कुळकर्णी-कवठेकर नावाच्या कवीला आणि नारायण नावाच्या या माझ्या मित्राला मन:पूर्वक शुभेच्छा...

**– प्रवीण बर्दापूरकर**
एल-९०, वसंतनगर,
लक्ष्मीनगरजवळ, नागपूर - ४४००२२
भ्रमणध्वनी : +९१ ९८२२०५५७९९
praveen_bardapurkar@hotmail.com




**दिवस असे की...**
**मूल्य २२५ रु.**
**सवलतीत १३५ रु.**




**नोंदी डायरीनंतरच्या**
**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

**प्रवीण बर्दापूरकर** यांच्या
**'दिवस असे की...'** आणि
**'नोंदी डायरीनंतरच्या'**
या दोन पुस्तकांचे प्रकाशन
**उद्धव ठाकरे** व **कुमार केतकर**
यांच्या हस्ते १९ डिसेंबर रोजी,
रवींद्र नाट्यमंदिराच्या मिनी थिएटरमध्ये
(तिसरा मजला), प्रभादेवी येथे
सायंकाळी ६.३० वाजता होत आहे.
तसेच या पुस्तकांचे पुनर्प्रकाशन
नागपूर येथे २१ डिसेंबर रोजी होईल.

# मराठी विकीपिडियावर तुमचे स्वागत असो!

**मेधा कुळकर्णी**

माहिती मिळवण्यासाठी इंटरनेटचा वापर करण्याची सवय आपल्याकडे बऱ्यापैकी रुळली आहे. 'गुगल सर्च'मध्ये आपल्याला हवा असलेला विषय टाईप केला की त्याची माहिती देणारे असंख्य दुवे संगणकाच्या पडद्यावर क्षणात उमटतात. त्यात विकीपिडिया अग्रक्रमी असतो. माहिती मिळवण्यासाठी इंटरनेटचा असा वापर करताना लक्षातही येत नाही की ही माहिती तिथे परिश्रमपूर्वक उपलब्ध करून दिली गेली आहे. ती अपौरुषेय वगैरे नसते. आपल्याला सहजी मिळत असलेली माहिती विविध वेबसाइट्सवर कुणीतरी नोंदवलेली असते. ती अद्ययावत ठेवण्याचं कामही सतत सुरू असतं. अद्ययावतपणा हेच या माहितीचं बलस्थान आहे. छापील माध्यम आणि इंटरनेट यातला मुख्य फरक हाच आहे.

'जे जे आपणासी जे ठावे, ते ते इतरांसी सांगावे, शहाणे करोनी सोडावे, सकलजन' असं संतवचन असलं तरी परंपरा नेमकी उलटी होती. माहितीवर विशिष्ट समाजाची मक्तेदारी होती आणि इतरेजनांना अज्ञानात पिचत ठेवून आपले हितसंबंध सांभाळत बसण्याचं काम पिढ्यान् पिढ्या या वर्गाने केलं. समाजसुधारकांचे प्रयत्न, शिक्षणाचा प्रसार आणि समाजातल्या तळच्या वर्गात झालेली जागृती यामुळे माहितीच्या मक्तेदारीला धक्के बसू लागले आणि समाजात घुसळण सुरू झाली. गेल्या दशकात इंटरनेट अवतरल्यावर होऊ लागलेला माहितीचा सुसाट प्रसार आणि त्यामुळे होणारी उलथापालथ आपण अनुभवतो आहोतच. भारतात खेड्यातल्या एखाद्या मुलीनं वा मुलानं अकल्पित प्रगती करण्यापासून अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी बराक ओबामा विराजमान होण्यापर्यंतच्या सर्व घटना या उलथापालथीतून झालेल्या परिवर्तनाच्या निदर्शक आहेत. माहिती- तंत्रज्ञानाचा विचार करताना हा सामजिक संदर्भ ठळकपणे लक्षात घ्यावा लागतो.

इंटरनेट हे मुळात माहिती खुलं करणारं माध्यम. त्याही पुढे जाऊन विकीपिडीयानं तर माहिती नोंदवण्याची प्रक्रियाच मुक्त केली. 'अखिल मानवसमाजानं निर्माण केलेलं ज्ञान पृथ्वीवरच्या प्रत्येक माणसाच्या हाताशी सहजी उपलब्ध व्हावं' अशी विकीपिडियाची प्रतिज्ञा आहे. माहितीवरची कुणा व्यक्तीची वा समाजाची मालकी मोडीत काढणारा आणि सर्वांनाच माहिती-योगदानाची संधी बहाल करणारा, सर्वांच्याच सहभागातून सतत वाहत राहणारा हा मुक्त प्रवाह.

जिमी वेल्स (जन्मवर्ष १९६६) या अमेरिकन इंटरनेट उद्योजकाच्या पुढाकारानं २००१ साली विकीपिडिया सुरू झाला. २००६ वर्षाच्या टाइम मॅगेझिननं जाहीर केलेल्या प्रभावशाली व्यक्तींमध्ये जिमी वेल्सचा समावेश होता. सर्वच वाचकांना लेखन-संपादनस्वातंत्र्य असल्यानं कोणीही काहीही लिहू शकेल आणि त्यातून अनर्थ निर्माण होईल अशी बरीच चर्चा विकी-पिडियाच्या निर्मितीनंतर झाली होती. 'नव्या'ला विरोध हे या चर्चेच्या मुळाशी होतं आणि सर्वसामान्य लोकांच्या प्रतिसादाविषयी आडाखा बांधता येत नव्हता. खुद्द जिमी वेल्सला भीती होती की हा प्रयोग पूर्णपणे फसेल. पण झालं अगदी उलटं! पहिल्या काही दिवसांतच माहितीची नोंद लोक जबाबदारीनं करताहेत असं दिसलं. लोकांच्या नोंदी, त्यावरचा प्रतिसाद यातून स्वनियंत्रणाची प्रक्रियाही विकसित होत गेली. यातूनच पुढे विकीपिडियाची नियमावली तयार होत गेली. खोडसाळपणा अजिबात होत नाही असं नाही, पण विकीपिडियाच्या उपयुक्ततेच्या तुलनेत त्याचं प्रमाण नगण्य असतं.

विकीपिडियाची गंमत अशी आहे की काही पानांचा अपवाद वगळता तिथल्या नोंदी, माहिती, लेखनाची शैली, नियमावली यापैकी कशालाही पूर्णविराम नाहीच. काळानुसार बदलणारा घटनाक्रम वा वाढत्या वाचक-लेखक-संपादक वर्गाकडे असणारी संदर्भसंपन्नता यातून आवर्तनं सुरू राहतात. माहिती अद्ययावत होत राहते.



विकीपिडियाच्या या विकासक्रमात इंग्रजी भाषेची मक्तेदारी ओलांडून तो देशोदेशींच्या अन्य भाषांच्या अंगणातही शिरला. युरोपमधल्या लयाला जात चाललेल्या लॅटिन भाषेत विकीपिडिया आहे आणि आशिया खंडातल्या कझाकिस्तान (पूर्वीच्या सोविएत रशियातील एक देश) देशाच्या कझाक भाषेतही आहे. यंदापासून सुरू केलेलं 'सर्वोत्तम जागतिक विकीपिडियन' हे पारितोषिक एका कझाकभाषकाला मिळालं आहे.

मराठी विकीपिडिया १ मे २००३ रोजी सुरू झाला. जगातल्या प्रत्येक भाषेतलं ज्ञान मराठीत आणि मराठीतलं ज्ञान जगातल्या प्रत्येक भाषेत मुक्तपणे उपलब्ध व्हावं हा मराठी विकीपिडियाचा उद्देश आहे. हे विचार आणि त्यासाठीचे प्रयत्न खूप उदात्त आहेत यात शंकाच नाही. मुळात कोणत्याही माहितीवर एखाद्या व्यक्तीची / समूहाची मालकी असू नये आणि माहितीचं भंडार प्रत्येकासाठी खुलं असावं असं लोकशाहीचं तत्त्व या विचारामागे आहे. आणि नव्या तंत्रज्ञानामुळे ही लोकशाही वास्तवात यायला सुरुवातही झाली आहे. फक्त माहितीकोशच नाही; तर आता विकीभाषा असा लोकांचा शब्दकोशही सुरू झाला आहे. आपण सर्वांनी या सर्व माध्यमांमध्ये योगदान केलं पाहिजे.

भारतातलं पहिलं विकीसंमेलन १८ ते २० नोव्हेंबर २०११ या काळात चर्चगेट इथल्या मुंबई विद्यापीठ परिसरात भरलं होतं. भारतीय भाषांमधल्या, खास करून मराठीतल्या विकीपिडियाचा विकास हा या संमेलनाचा मुख्य विषय होता. संमेलनाचं नियोजन विकिपिडियन्स स्वयंसेवकांनी केलं होतं. Paid services जवळपास नव्हत्याच. त्यामुळे एखाद्या साध्याशा NGO च्या कार्यक्रमासारखं वातावरण होतं. उत्साही तरुण-तरुणींची संख्या भरपूर होती. जिमी वेल्स यांनी उद्घाटनपर भाषणात भारतीय भाषांमधून सुरू झालेल्या विकीपिडियाला मिळणारा प्रतिसाद उत्साहवर्धक असल्याचं आणि त्यामुळे भाषक विकीपिडियांचा भविष्यकाळ उज्ज्वल असल्याचं सांगितलं. मराठीसह तेलुगु, मल्याळम्, तमीळ, बंगाली आणि गुजराती भाषांमधल्या विकीपिडियाच्या विकासाविषयी सत्रं आयोजली होती. विकीपिडिया वापरायचा कसा, विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी त्याची कशी मदत होऊ शकते, विद्यार्थी आणि विविध व्यावसायिक त्यात योगदान कसं देऊ शकतात, स्त्रियांचा सहभाग कसा वाढवता येईल अशा अनेक मुद्यांची चर्चा तिथे झाली.

सर्व वक्त्यांनी अगदी मोजक्या वेळात विषयाची मांडणी केली. त्यांची Power point presentations सुद्धा अगदी साधी आणि नेमकी व मुद्देसूद होती. त्यामुळे प्रश्न विचारायला श्रोत्यांना पुरेसा वेळ मिळू शकला. विकीपिडियाचं महत्त्व, त्याचा विकास, भारतीय भाषा आणि विकी-पिडिया, त्यावर लिहिणे (content) आणि त्याची तांत्रिक बाजू अशी विविध विषयांवर माहिती तिथे मिळाली.

विकीपिडिया हा एक मुक्त ज्ञानकोश असल्यामुळे सर्वसमावेशक पण तरीही तटस्थ दृष्टिकोनातून संदर्भासहित लेखन करणं हे विकीपिडियाचं सूत्र आहे. कोणतेही विषय लिहिताना सर्वसाधारणपणे कसे हाताळावेत किंवा काय काळजी घ्यावी याची माहिती विकीपिडियातच उपलब्ध आहे. वृत्तपत्रं, साप्ताहिकं, मासिकं यांची स्वतःची एक लेखनशैली असते. विकीपिडियाची लेखन-शैली अद्याप निश्चित झालेली नाही. परंतु विकीपिडियात काही नमुनालेख दिले आहेत. विकीपिडिया मुखपृष्ठ सदरातील लेखांची मांडणीसुद्धा यासाठी मार्गदर्शक ठरू शकते. ह्या लेखांची मांडणी जरी अंतिम नसली तरी अनेकांच्या सहभागातून ती तशी बनली आहे. लेख लिहिताना इंग्रजी शब्दांना पर्यायी मराठी शब्द, पारिभाषिक संज्ञा या लेखामध्ये उपलब्ध करण्यात आल्या आहेत. लेखकांच्या सहभागानं यात अधिकाधिक सुधारणा होत राहणं सुरूच असतं.

मराठी विकीपिडिया विकसित व्हावा म्हणून चिकाटीनं धडपडणारी टीम तिथे भेटली. फेसबुकसारख्या सोशल नेटवर्किंग साइट्सवर व्यतीत केल्या जाणाऱ्या वेळापैकी १०% वेळ तरी विकीपिडिया विकसित

**विकिपिडीया : आकड्यांमधून उलगडणारं वास्तव**

| भाषा | संपादकांची संख्या | लेखांची संख्या |
|---|---|---|
| इंग्रजी | ३५ हजार | ३० लाख |
| फ्रेंच | ५ हजार | ११ लाख |
| हिंदी | ५६ | १ लाख |
| मल्याळम् | ८५ | २१ हजार |
| तमीळ | ८३ | ४१ हजार |
| तेलुगु | ३२ | ४९ हजार |
| बंगाली | ४२ | २२ हजार |
| गुजराती | ९ | २१ हजार |
| पंजाबी | ३ | २० हजार |
| मराठी | ३१ | ३४ हजार |

करण्यासाठी प्रत्येकाने द्यावा अशी अपेक्षा तिथे व्यक्त केली गेली. मराठीतून लिहिणाऱ्यांची संख्या वाढावी यासाठी ते करत असलेल्या प्रयत्नांना मराठीप्रेमींनी, मराठी माध्यमांनी साथ द्यावी अशी विनंतीही केली गेली. आज इंटरनेटवर गुगल-खालोखाल वापरली जाणारी साईट विकीपिडियाची आहे. जगभरातल्या २८२ भाषांमध्ये विकीपिडिया सुरू आहे. मराठी भाषा पुढील काळात जगवायची असेल तर ती जास्तीत जास्त प्रमाणात वेब माध्यमात वापरली गेली पाहिजे. वेबवर मराठी आशय-निर्मिती परिश्रमपूर्वक करावीच लागेल. विकीपिडिया हा ना-नफा तत्त्वावर चालणारा उपक्रम आहे. कुठली एक बाजू न घेता तटस्थ भूमिकेतून माहिती नोंदवणं, माहितीच्या तथ्यांशाशी प्रामाणिक राहणं हा या उपक्रमाचा गाभा आहे. या गाभ्याला बाधा येऊ नये, या सूत्राच्या आड कोणतेही हितसंबंध येऊ नयेत म्हणून व्यापारी कंपन्यांकडून देणग्या घ्यायच्या नाहीत असं विकीपिडियाचं धोरण आहे. सर्वसामान्य व्यक्तींच्या छोट्या रकमेच्या (अगदी २५० रुपयांपासून) देणग्यांवर हे काम चालतं. तसं आवाहन मुखपृष्ठावरच वाचायला मिळतं. तेव्हा विकीपिडियाच्या विकासासाठी लेखन-संपादनासह आर्थिक योगदान करण्याचीही गरज आहे.

इथे हवे आहेत लिहिणारे, संपादन करू शकणारे, व्याकरणाच्या चुका दुरुस्त करू शकणारे, नवे शब्द निर्माण करू शकणारे, विकीपिडियाचा प्रसार करणारे लोक. प्रत्येकाला आपल्या आवडीच्या विषयावर लिहिण्याची मुभा आहे. विशिष्ट विषयात गती असणारे अनेकजण गट म्हणून एकत्र येऊन त्या त्या विषयाची समग्र माहिती लिहिण्याचं-ही काम करू शकतात. विकीपिडियात लेखन-संपादन करणारे दीर्घ काळ टिकून राहत नाहीत असा सर्वच भाषांच्या बाबतीतला अनुभव आहे. याची काही कारणं सापडतात. फेसबुकसारख्या साइट्सवर स्वैर लिहिण्याची सवय झालेली असते. कारण स्वतःच्या भावनाआविष्करणाची, विचारप्रकटीकरणाची ती जागा असते. याउलट विकीपिडियाला शुद्ध माहितीची गरज असते. तिथे शेरेबाजीला मुळीच थारा नाही, भाष्य, विश्लेषण याला फारसा वाव नाही. माहितीचे संदर्भही द्यावे लागतात. त्यामुळे शिस्तीचं बंधन येतं. आपण लिहिलेल्या माहितीचं संपादन अन्य कुणी करू शकतं. त्यामुळे आपल्या माहितीवर आपली मालकी राहत नाही. मराठीच्या आणि अन्य भारतीय भाषांच्या बाबतीत इच्छा असली तरी फॉन्टची अडचण येते. म्हणूनच विकी-पिडियात योगदान करणारे ९५ टक्के भारतीय आपापल्या मातृभाषेवजी इंग्रजी विकीपिडियासाठी लिहितात. ही झाली व्यवहारिक-तांत्रिक कारणं. याखेरीज आणखी काही प्रश्न आहेत.

आपण खरोखरच आपल्या भाषेवर प्रेम करतो का? मराठी भाषा टिकवण्याची आपली खरोखर इच्छा आहे का? या दोन्ही प्रश्नांची उत्तरं होकारार्थी असतील तर पुढचा प्रश्न उपस्थित होतो. आपल्या भाषेच्या संवर्धनासाठी प्रयत्न करण्याची, त्यासाठी जबाबदारी घेण्याची आणि मराठी भाषक म्हणून एकत्र येण्याची आपली तयारी आहे का? मराठी भाषेला महत्त्व आणि अधिक वेळ देणारी एवढी महत्त्वाची विकीपिडिया परिषद मुंबईत झाली. पण तिथे मराठी प्रकाशक, प्राध्यापक-विद्यार्थी, शासकीय अधिकारी, स्वयंसेवी संस्था आणि माध्यमातले लोक यांची उपस्थिती अत्यल्प होती. मराठी हा राजकारणाचा मुद्दा करणाऱ्या राजकीय पक्षांचे प्रतिनिधीही कुठे दिसले नाहीत. अन्य भाषांची माहिती घेताना जाणवलं की त्या त्या राज्यात, विशेषतः दक्षिणेत आणि बंगालमध्ये वेबमाध्यमात भाषा वापरण्यासाठी, आशयनिर्मितीसाठी भरपूर प्रयत्न होत आहेत. मराठीबाबतचं वास्तव मात्र क्लेशदायक आहे.

**– मेधा कुळकर्णी**
kulmedha@gmail.com


# सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या सहकार्याने 'ग्रंथाली'ची फिरती ग्रंथयात्रा

**उद्घाटन**

२३ डिसेंबर २०११

चंद्रमुखी बिल्डिंग, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, मुख्य कार्यालय

**वाचकदिन** २५ डिसेंबर २०११ कीर्ती कॉलेज मैदान,

**वाशिम** २४ ते २६ डिसेंबर २०११

**बुलढाणा** २८ डिसेंबर २०११ ते १ जानेवारी २०१२

**अकोला** ३ ते ८ जानेवारी २०१२

**यवतमाळ** ९ ते १३ जानेवारी २०१२

**अमरावती** १५ ते २० जानेवारी २०१२

**वर्धा** २४ ते २६ जानेवारी २०१२

**वणी** २८ जानेवारी २०१२

**गडचिरोली** ३० ते ३१ जानेवारी २०१२

**चंद्रपूर** १ ते ५ फेब्रुवारी २०१२ – साहित्य संमेलन

# कथा नृसिंह अवताराच्या मूळ स्थानाची!

**प्रभाकर भिडे**

पुण्याच्या सदाशिव पेठेत श्रीलक्ष्मी-नृसिंह मंदिर आहे. हे मंदिर अठराव्या शतकातील आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर या गावाजवळ राहणारे गणेशभट्ट जोशी हे आपल्या उपजीविकेकरता पुण्याला आले. त्यांचे कुलदैवत श्रीलक्ष्मी-नृसिंह हे होते. त्यांना वारंवार दृष्टान्त देऊन, स्वप्नात येऊन कुलदैवतांनी सांगितले, की श्रीक्षेत्र काशीजवळील काटेरी निवडुंगाच्या परिसरात मी आहे. तेथून तू मला पुण्याला घेऊन जा. त्यावेळी काशीपर्यंतचा प्रवास अतिशय कष्टप्रद होता, तरी देवांच्या ओढीने गणेशभट्ट काशीक्षेत्री गेले. सुदैवाची गोष्ट म्हणजे तेथे त्यांना निवडुंगात लक्ष्मी-नृसिंहाची मूर्ती सापडली. ती कधी पालखीतून, कधी हत्तीवरून, तर कधी स्वत:च्या खांद्यावरून मिरवत ते पुण्यास आले. या मूर्तीची कीर्ती सर्वत्र पसरल्यामुळे पुण्याच्या श्रीमंत पेशव्यांनी खूश होऊन या भाग्योदयी मूर्तीसाठी आम्ही सुंदर मंदिर बांधू असे सांगितले. तसेच मंदिराचे पुजारीपण तुम्हास वंशपरंपरागत देऊ असे वचन गणेशभट्टांना दिले. परंतु बाणेदार गणेशभट्टांनी पेशव्यांची इच्छा विनम्रपणे नाकारली. आपले कुलदैवत- जे आपणाला प्राणापलीकडे प्रिय आहे- त्याचे मंदिर यथाशक्ती स्वत: बांधू असा निश्चय केला. थोड्याच दिवसांत पुण्याला सदाशिव पेठेत, पूर्वीच्या अनाथ विद्यार्थि-गृहासमोरच्या वाड्यात सुंदर मंदिर बांधले. गेल्या नऊ पिढ्या नृसिंहसरस्वतीची मनोभावे सेवा करत आहेत. त्यांची अशी समजूत आहे, की आपण करत असलेल्या सेवाधर्मामुळे जणू श्रीलक्ष्मी-नृसिंह या जागृत दैवताची आपल्यावर कृपा आहे.

अनंतराव जोशींचा एक पुत्र सध्या अमेरिकेत आहे. त्याला इंटरनेटवरील वेबसाइटमुळे श्रीलक्ष्मी-नृसिंहाचे मूळ स्थान पाकिस्तानात आहे हे कळले. पाकिस्तानातील मुलतान शहरातील 'प्रल्हादपुरा' येथे नृसिंहाचे मंदिर असून तेथे केवळ एक पुरातन स्तंभ शिल्लक आहे. स्तंभातून प्रकटलेल्या नृसिंहाने राजा हिरण्यकश्यपूचा वध केला म्हणून या भागाचे नाव प्रल्हादपुरा. अनंतराव जोशी यांनी ते मूळ स्थान डोळ्यांनी पाहण्याचा संकल्प केला.

अमेरिकेत वास्तव्य करूनसुद्धा शिक्षणाबरोबर श्रीनृसिंहाचे मनन, चिंतन करणाऱ्या पुत्रामुळे ही इच्छा पूर्ण होण्यास मदत झाली. यातूनच अनंतरावांच्या मुलतान भेटीची मुहूर्तमेढ रचली गेली असावी.

काही काही गोष्टींचा योग जुळून यावा लागतो. मध्यंतरी (इ.स. २००४) अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना, त्यांनी पाकिस्तानाबरोबर संबंध सुधारावे म्हणून बरेच प्रयत्न केले. भारत-पाकिस्तानच्या सरहद्दीच्या गावांमध्ये बससेवा सुरू केली. ते स्वत: बसमध्ये बसून पाकिस्तानला गेले. या सुधारित वातावरणात भर घालण्यासाठी भारत-पाक क्रिकेटचे सामने ठरवले गेले. सुदैवाने त्यातील एक 'वन डे मॅच' मुलतानमध्ये ठेवली गेली. मग अनंतराव जोशींच्या आशा पल्लवित झाल्या. त्यांच्या दिल्लीच्या ओळखीच्या गृहस्थाने त्यांना पाकिस्तानचा व्हिसा फॉर्म पाठवला. एका मुलाने क्रिकेटच्या मॅचचे तिकीट काढून दिले. दुसऱ्या मुलाने विमानाचे तिकीट काढून दिले. जोशींना वाटले, की नृसिंहाच्या इच्छेने व कृपेनेच आपण मुलतानला जात आहोत. मुलतानला जाणार कोणाकडे? कोण देईल आपल्याला नृसिंहावताराची माहिती? त्यांना तेथील मुलतानी माती व नृसिंहावताराच्या खांबात वीट आणण्याची इच्छा होती. तसे ते त्यांच्या देवळातल्या देवासमोर मनोमन बोलले होते! म्हणतात ना, की इच्छा असली की मार्ग दिसतो.

दरम्यान, त्यांना मुलतानमधील एका कर्तबगार व सज्जन गृहस्थाची माहिती मिळाली. त्याचं नाव इर्शाद हुसेन गर्देजी. त्यांना अनंतराव जोशींनी पत्र लिहिले. त्यांत त्यांनी पुण्यातील मंदिरापासून सर्व वस्तुस्थिती कथन केली. परंतु नृसिंहाचे मूळ मंदिर मुलतान येथे असून त्याचे दर्शन करण्याची इच्छा आहे, मुलतानला भेट देण्याची इच्छा आहे असे कळवले. सोबत पुण्यातील मंदिराचे फोटो व माहिती पाठवली आहे. तेथील मंदिराचे फोटो पाठवण्याची विनंती केली. त्यांचे ताबडतोब उत्तर आले, की आपण केव्हाही या, मी आपले स्वागतच करीन.

नंतर एक महिन्याने त्यांना जोशींच्या चिरंजीवांनी इ-मेल पाठवली. त्याचे उत्तर आले, की 'मी फोटो पाठवतो. पण आमच्या धर्मांध व अशिक्षित लोकांनी मंदिर उद्ध्वस्त केले, त्यामुळे मी फोटो पाठवण्यास धजावत नव्हतो.' तेवढ्यात जोशींच्या दैवयोगाने, मुलतानला क्रिकेटची 'वन डे' मॅच होती त्याऐवजी पाच दिवसांची टेस्ट ठरली. परमेश्वर खरेच आपली पाठराखण करतोय असे जोशींना वाटले. केवळ एका दिवसात मुलतानमधील मंदिराचा मूर्तीचा सर्व बाजूने शोध घेणे जमले नसते. आता पाच दिवस मुलतानमध्ये राहता येईल. मग दिल्लीला जाऊन पाकिस्तान वकिलातीमध्ये व्हिसासाठी अर्ज केला. लगेच त्याच दिवशी काम झाले.


२५ मार्च २००४ रोजी, दिल्ली मुक्कामी असताना गर्देजींना फोन केला आणि त्यांना येत असल्याचे कळवले. मुलतानला उतरल्यावर फोन करा म्हणजे मी तुम्हाला

पिक-अप करून हॉटेलवर सोडतो, असे गर्देजी म्हणाले. जोशींना संकोच वाटत होता. मुलतानला जाण्यासाठी प्रथम लाहोरला जावे लागते. ते विमान दुपारी पावणेदोन वाजता होते. पाकिस्तान एअरलाइन्सचे होते. दिल्ली-लाहोर प्रवास फक्त चाळीस मिनिटांचा होता पण विमान सव्वातीन वाजता सुटले. जोशींना लाहोरला उतरल्यावर इमिग्रेशन, बॅगेज व एक्स्चेंजला किती वेळ लागणार, आपण मुलतानला केव्हा पोचणार, याची काळजी वाटत होती. सुदैवाने तीन मिनिटांत सर्व सोपस्कार पार पाडून अनंतराव जोशी विमानतळाबाहेर पडले.

मुलतानच्या बसमध्ये शेजारी बसलेले इलियाझ शेख यांची पुस्तकाची दुकाने होती. त्यांनी मुलतानमधील भावाच्या दुकानाचा पत्ता दिला. मुलतान या शहरावर 'मुलतान पास्ट अ‍ॅण्ड प्रेझेंट' असे सुंदर पुस्तक आहे ते वाचा, असा सल्ला दिला. गर्देजींना फोन करून स्टॅंडवर किती वाजता यायचे ते सांगितले. २००४ साली बसमध्ये सर्वांकडे मोबाइल होते व ते सतत वाजत होते. (विशेष म्हणजे पाकिस्तानमध्ये मोबाइल सर्वांत स्वस्त आहे व इनकमिंग कॉल सर्व पाकिस्तानभर फ्री).

गर्देजींनी अनंतराव जोशींना हॉटेलवर न नेता आग्रहाने घरी नेले. त्यांचा मोठा बंगला होता. जोशींना त्यातील एक मोठी अ‍ॅटॅच्ड बाथरूम खोली दिली. गेल्या गेल्या किनोज फळाचा ज्यूस, मग चहा व खाण्यास दिले. इतके चांगले स्वागत झाले. गर्देजी अगत्यशील, साधे गृहस्थ होते. खोलीत वॉल टु वॉल कार्पेट, बाथरूम बघितल्यावर तर जोशींना पंचतारांकित हॉटेलमध्ये आल्यासारखे वाटले. इतकेच नव्हे, तर त्यांनी जोशींच्या घरी पुण्याला मुलाला फोन करून जोशी सुखरूप पोचल्याचे कळवले.

मुलतानमध्ये एका हिंदू गृहस्थाकडे दोन मूर्ती असून त्या लॉकरमध्ये ठेवल्या आहेत हे कळले. त्या बघण्यासाठी गर्देजींनी गाडी दिली. त्यांतील एक मूर्ती व्यासांची आणि दुसरी लक्ष्मीची होती. त्या बघितल्यावर तिथून किलाभाग इथे गेले. त्याच भागाला पूर्वी प्रल्हादपुरा म्हणून ओळखले जाई. याच भागात भगवान नृसिंहाचे प्राचीन मंदिर होते. हे कळल्यामुळेच जोशींनी मुलतानला येण्याचा आटापिटा केला होता. पूर्वी किल्ल्यात दारूगोळ्याचा साठा होता. तिथे मोठा स्फोट होऊन सदर जागा उद्ध्वस्त झाली होती, पण ज्यातून नृसिंह महाराज प्रकट झाले असे सांगत असत, तो प्रचंड मोठा गोल स्तंभ, आजही भग्नावस्थेत मध्यभागी उभा होता. त्याची उंची पंधरा फुटांहून जास्त असावी.



पाकिस्तानातील
मूलतानमधील नृसिंहाचे मंदिर

शेजारी मोठी मशीद होती, त्याची भिंत प्रचंड होती. त्यावरून उड्या मारून जोशी आत गेले. आपल्याकडे बऱ्याच मंदिरांच्या गाभाऱ्याचा दरवाजा जास्त उंच नसतो. बहुधा आपण नतमस्तक व्हावे म्हणून दरवाजांची उंची कमी ठेवत असावेत. कदाचित परकीय आक्रमणाची भीती असल्यामुळे उंची कमी ठेवत असावेत. या दृष्टीने मुलतानच्या मंदिराच्या गाभाऱ्याच्या दरवाजाची उंचीसुद्धा कमी असावी. मंदिराच्या कळसाची मोडतोड झाली होती. आत प्रवेश केल्यावर भगवान नृसिंहमहाराजांच्या प्रकट झालेल्या स्थानावर पंधरा ते अठरा फूट उंचीच्या स्तंभाजवळ जाऊन जोशी उभे राहिले. पूर्वी मंदिराची माहिती मिळाली तेव्हा, पडझड झाली असून फक्त अवशेष शिल्लक आहेत असे कळले होते. मूर्ती १९४७ सालीच नाहीशी झाली होती. त्यामुळे भगवान नृसिंहमहाराजांचा पदस्पर्श झाला होता तिथे जोशींनी मस्तक टेकवले आणि तिथली माती कपाळी लावली. तशीच थोडीशी माती भारतात नेण्यासाठी बरोबर घेतली. पण स्तंभ दिसेल व दर्शन होईल याची काहीच कल्पना नव्हती. त्यामुळे तिथे गेल्यावर मन शांत झाले. काहीतरी बघितल्याचे समाधान झाले. स्तंभ दुभंगलेल्या अवस्थेत होता. मस्तक टेकवताना वाटत होते की नृसिंहमहाराज प्रकट होऊन दर्शन देतील का?

जोशींचे मन भावभावनांनी भरून गेले. त्यांच्या स्वप्नातल्याप्रमाणे मंदिरात ते एकटेच होते. पण मंदिरातली स्वप्नात आलेली मूर्ती कुठेच दिसली नाही. एकच गोष्ट सत्य होती. भग्नावस्थेतील मंदिरातील स्तंभही भंगलेला होता. हा स्तंभ मुळात रुद्रावतार धारण करणाऱ्या श्रीनृसिंहाचे रूप प्रकट होण्यास कारणीभूत ठरलेला. मग आता हे मंदिर भग्न होताना देव पुन्हा का नाही प्रकटला, असे विचार मनात येताच त्यांना वाटले, की विविध अवतारांत जाणवणारे देवाचे अस्तित्व अशा वेळी कोठे जाते?

तरी मूर्तीचे दर्शन न झाल्याने त्याचा शोध त्यांच्या मनातून जाईना. मग मुलतानमधील पुस्तकांची दुकाने त्यांनी बघितली. पण माहिती मिळाली नाही. पाकिस्तानमधील इतिहासाचे अभ्यासक डॉक्टर दुराणी यांची जोशींनी भेट घेतली. त्यांनी, मुलतानमधील सिटी लायब्ररीमध्ये जाऊन ओबेद कमाल यांना भेटा, तुम्हाला पुस्तक व फोटो दोन्ही मिळतील असा सल्ला दिला.

मंदिर परिसर सोडून बाहेर पडल्यावर श्रद्धावान माणसाचे पाय जड होतात. हे मूळ स्थान म्हणजे आजचे मुलतान-हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासातील एक महत्त्वाचे स्थान. भगवान नृसिंह व वामन अवतार हे या ठिकाणाचे म्हणून मूळ स्थान म्हणजे पवित्र तीर्थक्षेत्र.

मंदिराचा शोध घेताना तेथे त्यांना प्रो.

जाफरुद्दिन भेटले. त्यांचे वय चौऱ्याहत्तर. हे शिक्षणखात्याचे, पंजाब प्रांताचे प्रमुख होते. त्यांच्या म्हणण्यानुसार देवळात मूर्ती नसून- गाभाऱ्यात जो स्तंभ आहे तो अग्नीचे प्रतीक म्हणून तांबूस-लाल आहे. बाजूच्या भिंतीचा (गाभाऱ्याच्या) रंग गुलाबी आहे. गर्देजींच्या म्हणण्याप्रमाणे करबलाच्या ठिकाणी हाच रंग आहे. नृसिंहाने हिरण्यकश्यपूचे पोट फाडल्यावर प्रल्हादाने त्यांना सूरजकुंड या ठिकाणी ठेवले व शांत केले. जाफरुद्दिन यांनी Brief History of Multan हे पुस्तक जोशींना भेट दिले.

या नृसिंहावताराच्या संदर्भात, जोशींनी संपूर्ण पंजाब प्रांताचे कमिशनर असलेले राणा यांची भेट घेतली. ही भेट गर्देजीमुळे झाली. त्यांची व गर्देजीची चांगली मैत्री होती. पंजाब प्रांत वाघा बॉर्डरपर्यंत असल्यामुळे राणांचा अधिकार तेथपर्यंत चालत असे. त्यांच्याशी चर्चा केल्यावर राणासाहेब व जोशी दुसऱ्या दिवशी शहर वाचनालयात गेले. त्यांच्या चर्चेमधून मुलतानसंबंधी व नृसिंहावताराविषयी दहा पुस्तकांची यादी तयार केली. तेथे १९३८ साली मुलतानसंबंधी एक पुस्तक इंग्रजीत प्रकाशित झाले. त्याचे नाव आहे- Sayyad Aylab Ali Gilani-Muraga E-Multan त्या पुस्तकाच्या संदर्भाप्रमाणे पूर्वी तेथील मूर्ती सोन्याची होती. या मूर्तीच्या दर्शनासाठी देशामधून अनेक लोक येत असत. देवाला सोने, इतर संपत्ती व चंदन अर्पण करत असत. मूर्तीच्या डोळ्यांमध्ये दोन रुबीचे खडे होते. त्यामुळे मूर्तीकडे बघताना ती आपल्याकडे पाहते आहे, असा भास होत असे.

दुसऱ्या एका पुस्तकाच्या संदर्भावरून देवळाच्या चारी बाजूला शंभर स्क्वेअर यार्डचा तलाव होता. आतील बाजूस पन्नास स्क्वेअर यार्डची प्लींथ होती. मूर्ती तांबड्या रंगाची होती. महंमद बीन कासीमने प्रचंड हल्ला करून सोने व संपत्ती लुटून नेली. मूर्तीचे तुकडे केले.

प्रल्हाद विष्णूचा भक्त होता. त्याचा नातू बळी (राजा) हा आदित्याचा (सूर्य) भक्त होता. बळीचा शत्रू सबा होता, अशी कथा आहे. पूर्वी मंदिरावर कुठलाही ध्वज अगर पाटी नव्हती. १८५३ पर्यंत मुस्लिम हल्ल्यानंतर वापर नव्हता पण नंतर ते दुरुस्त करून नृसिंहाची स्थापना करण्यात आली. १८७६ मध्ये देऊळ बांधून पूर्ण झाल्यावर आश्विन व वैशाख महिन्यात मंदिरात उत्सव होत असे. महंतबाबा रामानंद यांनी १९४७ साली मूर्ती हलवून फत्तेचंद तागसलिया गुरुद्वारात नेली. हे गुरुद्वार भाजी मंडईजवळ होते. आता ते गुरुद्वार पाडून इतर इमारती झाल्या आहेत. त्यामुळे मूर्तीचा निश्चित ठिकाणा कळला नाही.

पूर्वीच्या शीख राज्यकर्त्यांच्या काळात खर्चासाठी अनेक गावे इनाम म्हणून जोडली गेली होती. मुलतान शहरातील प्रत्येक दुकानदार रोज एक पैसा याप्रमाणे देणगी देत असे. साहजिकच देवाचे उत्पन्न चांगले होते. गर्देजींनी लहान असतानाची हकिगत सांगितली, की ते स्वत: फोटो काढत. ते म्हणाले, 'मुलतानमधील सुप्रसिद्ध फोटोग्राफर हिंदू होते. नुकतेच ते शंभर वर्षे पूर्ण होऊन वारले. त्यांनी निधनापूर्वी मुस्लिम धर्म स्वीकारला होता. परंतु पुढे त्यांच्या मुलाने पूर्वीचे सर्व फोटो नाहीसे केले. त्यांचा मुलगा- कामर परवेझ याला वडिलांचे पूर्वीचे नाव विचारले असता त्याने काहीच माहिती दिली नाही.

पुढे प्रल्हादाच्या नातवाच्या काळात नृसिंहमंदिर सूर्यमंदिरात रूपांतर झाले असावे असा अंदाज आहे. अनंतराव जोशी पाकिस्तानात गेल्यावर त्यांच्या पाकिस्तान- विषयीच्या अनेक भ्रामक कल्पना दूर झाल्या. त्यांचे प्रत्येक ठिकाणी चांगले स्वागत होत असे. लोक भारतद्वेष्टे वाटत नाहीत. काही मूलतत्त्ववादी सोडले तर नव्वद टक्के जनतेला शांतता हवी आहे, असे लक्षात आले.

## नृसिंह महाराजांच्या मूर्तीचा भारतातील शोध

अनंत जोशींची नृसिंहावताराचे मूळ स्थान (मुलतान) बघण्याची इच्छा पूर्ण झाली. पण मूर्तीचे दर्शन झाले नाही. एकेक गोष्टीचा योग यावा लागतो. ते पुण्याला आले. तो शनिवार होता. त्यांनी मुलतानमधील माती व वीट देवळात देवाच्या पायांशी ठेवली त्यावेळी वडील देवपूजा करत होते. एक प्रकारचे आंतरिक समाधान झाले होते. त्यांनी मुलतानमधून जे उर्दूतील डॉक्युमेंट आणले होते. त्यांचे मराठी रूपांतर पुण्याचे प्रसिद्ध इतिहासप्रेमी व उर्दू-फारसीचे जाणकार संजय गोडबोले यांनी करून दिले. त्यांचे एक मित्र डॉ. शबाब ललित, वय वर्षे ऐंशी. सध्या सिमला शहरात राहतात. ते १९४७ साली निर्वासित म्हणून भारतात आले. त्यांच्यासारखे इतर अनेक लोक दिल्ली, पंजाब, हरियाणामध्ये निर्वासित म्हणून स्थायिक झाले आहेत. आता संजय गोडबोले जोशींच्या मदतीला धावून आले. त्यांनी डॉ. शबाब ललित यांच्याशी संपर्क साधून त्यांचे पत्र मिळवले. त्या सर्वांशी फोनवर बोलणे केले. त्या लोकांना मराठी समजत नसल्यामुळे मुलतानमधून आणलेल्या सर्व कागदपत्रांचे इंग्रजी भाषांतर केले ते सर्व त्यांच्या पत्त्यावर कुरियर केले. या सर्व दुर्दैवी लोकांनी भारतात आल्यावर 'मुलतान सेवा संघ' स्थापन केला असून त्याचे कार्य आजही चालू झाले. त्यांतील एक सद्‌गृहस्थ जे.सी. बत्रा (Bar at Law) जे सराईक भाषाशास्त्राचे तज्ज्ञ आहेत, यांनी चांगले मार्गदर्शन केले. त्यांचे आजचे वय सहासष्ट आहे. त्यांना मूर्ती बघितल्याचे आठवत नाही पण त्यांनी एवढे निश्चितपणे सांगितले, की तेथील पुजाऱ्याने मूर्ती हलवून भारतात हरिद्वारला आणली असून त्याची पूजाअर्चा रोज होते.

आज ते पुजारी हयात नाहीत पण मुलतान सेवासंघाशी पत्रव्यवहार करा, असे बत्रा यांनी सुचवले. मुलतानमधील ऐतिहासिक दस्तावेजांमध्ये तेथील मूर्ती हलवून भाजीमंडीजवळील गुरुद्वारात नेली असा उल्लेख आहे. पण ते गुरुद्वार शिल्लक नसल्यामुळे पुढे काहीच कळले नाही. कदाचित तो पुजाऱ्याने दिलेला चकवा होता. असा चकवा दिल्यामुळे त्या महान भक्ताला (नारायणदास बाबामहाराज) ती मूर्ती सुखरूप भारतात आणता आली असावी. अनंतरावांना हरिद्वारला जायचे वेध लागले.

आता मुलतानमधील भगवान नृसिंह व

भक्त प्रल्हादाची मूर्ती हरिद्वारला आणून पुन्हा स्थापन केली ते ठिकाण व त्याचा पत्तापण त्यांना मिळाला होता. त्यांनी हरिद्वारच्या नृसिंह मंदिराच्या पत्त्यावर मुलतानमधील कागदपत्रांच्या इंग्रजी-मराठी दोन्ही प्रती, पुण्यातील देवळाचे फोटो व पुस्तक पाठवले. मुलतान शहर हे तीर्थक्षेत्र असून प्राचीन काळापासून खूप प्रसिद्ध आहे. तिथे हिरण्य-कश्यपूप्रमाणे बळीराजाचे राज्यपण होते. थोडक्यात, तेथे दशावतरातील वामनावतार झाला.

बत्रा हे दिल्लीतील लॉ कॉलेजात प्रोफेसर आहेत तसेच सुप्रीम कोर्टात वरिष्ठ वकील आहेत. त्यांनी जोशींना दिल्लीचे आमंत्रण दिले तसेच ते हरिद्वार ऋषिकेशला त्यांच्याबरोबर येणार असल्याचे सांगितले. दिल्लीला त्यांच्या घरी राहण्याचे आमंत्रण दिले. ठरल्याप्रमाणे अनंतराव जोशी सपत्नीक दिल्लीला गेले. तेथून हरिद्वारला गेले. मूर्ती ज्या मंदिरात आहे ते नृसिंहधाम रोड या भागात आहे. मूर्तीचे तेज व वेगळेपण एकदम उठून दिसते. त्या मंदिराची धर्मशाळासुद्धा आहे. हीच ती मुलतानमधील मूळ मूर्ती आहे, असे एकदम लक्षात येते. या मूर्तीचे रूप अतिशय उग्र स्वरूपाचे असूनही मनात भय न वाटता समाधान वाटते. मूर्ती पांढऱ्या संगमरवराची असून बाकीचे शरीर निरनिराळ्या वस्त्रांनी व सुगंधित फुलांनी झाकले गेले आहे.

ज्यांनी मूळ मूर्ती भारतात आणली, ते नारायणदास बाबामहाराज आज हयात नाहीत. त्यांचे १९८८ साली महानिर्वाण झाले. त्यांचेच शिष्य आज त्या गादीवर विराजमान असून ते सर्व सध्याची व्यवस्था बघतात. मूर्ती आणण्यासंबंधी सध्याच्या व्यवस्थापकांना विचारले असता त्यांनी एवढेच सांगितले, की मूर्ती व्यवस्थित पॅक करून (लाकडी खोक्यात) हेलिकॉप्टरने विमानतळावर नेली. तेथून ती हिंदुस्थानात नेण्यासाठी विमानात ठेवण्यासाठी कोणी तयार नव्हते. लोक ओरडत होते, 'तोड दो मूर्ती को', पण नारायणदास बाबा घाबरले नाहीत, डगमगले नाहीत. त्यांनी सिंहगर्जना केली, 'ही माझी बंदूक पाहा, जर ही मूर्ती विमानात चढवली नाहीत, तर या बंदुकीचा वापर करायला लागेल. मला भगवान नृसिंहाचा रुद्रावतार धारण करायला लावू नका. हकनाक आपले प्राण गमवाल'. एवढ्या दमानेच लोक घाबरले. मूर्ती विमानात ठेवली गेली. दिल्लीमार्गे हरिद्वारला आणून व्यवस्थित प्राणप्रतिष्ठा करून स्थापित केली गेली. आता ती मूर्ती असलेले सुंदर मंदिर उभे आहे.

अशा तऱ्हेने अनंतराव जोशींचा भगवान श्रीनृसिंहावताराच्या मूळ स्थानाचा शोध व मूर्तीदर्शन पूर्ण झाले. हे सर्व त्यांच्या 'मूल-स्थानाचा ध्यास' या पुस्तकात विस्तृतपणे सांगितले आहे. सध्या पुस्तकाची आवृत्ती संपल्यामुळे उपलब्ध नाही. अशा तऱ्हेने एखाद्या गोष्टीचा ऐतिहासिक मागोवा घेतल्यास पुराणातील वानगी पुराणात न राहता वस्तुस्थिती कळण्यास मदत होईल.

**– प्रभाकर भिडे**
बी-२०१ यमुना माधव सोसायटी,
सावरकर रोड, डोंबिवली (पूर्व)
भ्रमणध्वनी - ९८९२५६३१५४

# वाचकदिनाचा महिना!

मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे यांच्या सहकार्याने

## 'ग्रंथाली ठाणे केंद्र' वाचकदिन

**शनिवार, १७ व रविवार, १८ डिसेंबर २०११**

**दुपारी ३ ते सायंकाळी ६.३०**

विषय : **श्यामची आई**

'श्यामची आई' पुस्तकाला ७५ वर्षे पुरी होत आहेत. वाचकदिनी ठाणे परिसरातील शाळा त्यावर आधारीत एकेक कार्यक्रम करणार आहे.

**नंदिनी बर्वे,अविनाश बर्वे व श्रीधर गांगल :** संयोजक, ग्रंथाली

**मा. य. गोखले (अध्यक्ष), राजेंद्र वैती (कार्याध्यक्ष) :** ठाणे ग्रंथसंग्रहालय

---

कीर्ती महाविद्यालयाच्या सहकार्याने

## 'ग्रंथाली' वाचकदिन

**रविवार, २५ डिसेंबर २०११**

**सायंकाळी ५ वाजल्यापासून**

**कीर्ती महाविद्यालय पटांगण, प्रभादेवी**

प्रसिद्ध होत आहेत पुढील पुस्तके

**बोधकथा** – दिलीप पांढरपट्टे

**नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०११** – सुधीर-नंदिनी थत्ते

**व्हिस्परिंग लॅण्ड** – अनु. जयश्री गोडसे

**अजब सहवास** – गो.आ. भट

आणि वार्षिक गाठीभेटींसह सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम

# औषधांचं 'मी'पण

**डॉ. उज्ज्वला दळवी**

चार वर्षांपूर्वी, कॅनडामध्ये टोरांटो शहरात, तारीग नावाच्या एका बारा दिवसांच्या बाळाचा श्वास अचानक थांबला. ते काळंनिळं पडलं. तत्काळ हॉस्पिटलमध्ये नेऊनही ते वाचू शकलं नाही. तपासामध्ये कळलं, की त्याच्या रक्तात श्वसनक्रिया मंद करणारा, मॉर्फिन हा अमली पदार्थ फार मोठ्या, घातक प्रमाणात होता. तारीगला त्याला कामाला लावतं आणि त्याच्यापासून मॉर्फिन (अफूमधला मादक पदार्थ) हे प्रभावी दुःखनाशक बनवतं. या कामाला लावणाऱ्या मुकादम प्रथिनाचं अगडबंब नाव आहे CytochromeP4502D6. तारीगच्या आईच्या यकृतात या प्रथिनाचं प्रमाण सर्वसामान्यांच्या तुलनेत तिप्पट होतं. त्यानं कोडीनचं मॉर्फिन करायचा सपाटा लावला. हजारांहून अधिक भाऊबंद संपूर्ण प्राणीजगतात पसरलेले आहेत. प्राणवायू देणारी ही लोहयुक्त प्रथिनं शरीराच्या वेगवेगळ्या भागांत काम करतात. मानवी यकृतात काम करणारे यांच्यातले पाच प्रमुख भाऊबंद अतिशयच महत्त्वाचे आहेत. माणसांना दिल्या जाणाऱ्या एकूण औषधांपैकी नव्वद टक्के औषधांशी हे पाच भाऊ पंगा घेतात.

> देव जनुकं वाटतो तेव्हा आपण परात घेऊन जातो की चाळणी ह्यावरून आपल्या शरीरात शिरणाऱ्या औषधांची चालचलणूक ठरते. त्या जनुक-वाटपात आपल्या पदरी काय पडलं आहे हे बघणं दिवसेंदिवस सोपं होत चाललं आहे. त्यामुळे औषधांशी जनुक-चाचण्यांची सांगड घालून आपल्याला मानवणाऱ्या नेमक्या औषधाचा नेमका डोस ठरवणं शक्य झालं आहे.

तर कुठलंही औषध दिलेलं नव्हतं. पण त्याच्या आईला मात्र प्रसूतीनंतरचं दुखणं कमी करणारी कोडीनची सर्वसामान्य गोळी दिली होती. तशी गोळी त्या प्रकारच्या दुखण्यासाठी द्यायचा कॅनडातच काय, जगभर प्रघात होता. ही गोळी कुठल्याही बाळाला घातक ठरल्याचं कुठे नमूद केलेलं नव्हतं. इतकंच नव्हे, तर काही आयांनी त्या गोळीचा दुप्पट डोस घेऊनही त्यांची बाळं सुखरूप होती.

या दुर्दैवी बाळाच्या आईवडिलांच्या आक्रोशाला प्रतिसाद आला तो कॅनडाच्या दुसऱ्या टोकाहून. जनुकशास्त्रज्ञ डॉ. मायकेल हेडन आणि औषधशास्त्रज्ञ डॉ. ब्रूस कार्लटन या व्हॅन्कूव्हरच्या दोघा संशोधकांनी या अपघाताच्या कारणाचा छडा लावला. दुखण्यासाठी घेतलेलं कोडीन यकृतात पोचलं, की तिथलं एक प्रकारचं प्रथिन (protein) त्यामुळे तिच्या रक्तात मॉर्फिनची मात्राही तिप्पट झाली आणि ती तिच्या पान्ह्यातून तान्ह्यापर्यंत पोचली.

औषध म्हणून किंवा अन्न म्हणून वेगवेगळे रासायनिक पदार्थ प्राण्यांच्या शरीरात येत असतात. अशा साऱ्या परक्या पदार्थांना शरीर तावून सुलाखून घेतं. त्यामुळेच तर अनोळखी पानं-फळं-कंदमुळं चाखून बघणारे प्राणी आणि आदिमानव देखील या पृथ्वीतलावर टिकून राहिले. या परक्या पदार्थांना कामाला लावणं, त्यांच्यावर नजर ठेवणं, काम झालं की त्यांना बकोटीला धरून शरीराबाहेरची वाट दाखवणं; हे सारं करणारे मुकादम म्हणजे enzyme गटातली प्रथिनं. परक्या पदार्थांवर नजर ठेवणाऱ्या या अशा प्रथिनांची अनेक घराणी आहेत. त्यांतलं सर्वांत मातब्बर घराणं आहे ते Cytochrome P450 किंवा CYP घराणं. या घराण्यातले दोन

त्यांच्यातही दादा आहे तो CYP2D6. आपण घेतो त्यांपैकी एकचतुर्थांश औषधं याच्या हुकुमाप्रमाणे वागतात. ही नेहमीची औषधं म्हणजे कुठली कुठली? त्यांत कोडीनसारखी दुखण्यावरची, झोप आणणारी औषधं आहेत. ॲण्टिबायोटिक्स आहेत. रक्तदाबावरचे, औदासीन्यावरचे, मानसिक संतुलन सावरणारे, सर्दी-पडसं-खाज-ॲलर्जी यांच्यावरचे, टीबी-कॅन्सर यांचे, ओकाऱ्यांवरचे असे नानाविध उपचार आहेत. हे सारे प्रकार या दादाच्या हुकमतीखाली असतात. तो सर्वांशी सारखा वागत नाही. यांतल्या कोडीनसारख्या काही औषधांना तो कामाला लावतो. तर औदासीन्य दूर करणाऱ्या, नॉरट्रिप्टिलीन-सारख्या काही औषधांचं काम झालं, की हा दादा त्यांना निष्क्रिय करून टाकतो.

यकृतातली ही मुकादम प्रथिनं तयार

कशी होतात? पेशींच्या जनुककोशात (genome) या प्रथिनांची कृती जनुक-भाषेत लिहिलेली असते. या भाषेतलं एक वाक्य म्हणजे एक जनुक (gene). एका जनुकात एका प्रथिनाची कृती दिलेली असते. CYP2D6 या दादाची जडणघडण ठरवणारंही जनुक आहे. बऱ्याच माणसांत हे जनुक एकच असतं. त्यांना दादाच्या आज्ञेबरहुकूम चालणाऱ्या औषधांचा सामान्य डोस लागू पडतो, मानवतो.

काही लोकांत तशी दोन जनुकं असतात. त्याचाच अर्थ या रोजच्या औषधांवर दुप्पट दादागिरी चालते. त्यामुळे कधी कधी त्यांची कामगिरी अती वाढते आणि घातक होते. तारीगच्या आईच्या पेशींमध्ये तर अशी तीन जनुकं होती. म्हणूनच कोडीनच्या कामकरी रूपाला, मॉर्फिनला, उधाण येऊन ते तिच्या पान्ह्यात उतू गेलं. उत्तर आफ्रिकेतल्या काही देशांतल्या आणि मध्यपूर्वेच्याही माणसांत या CYP2D6 साठी असलेल्या जनुकांची संख्या आणखीही मोठी असू शकते. त्यांच्यात कोडीनचा सामान्य डोसही घातक ठरू शकतो. पण औदासीन्यावरच्या ज्या औषधांचं काम हा दादा थांबवतो, अशी औषधं या दादांच्या मांदियाळीमुळे अधिकच जलद निष्क्रिय होतात आणि कसलाही इलाज न करता फुकट जातात. यातला मोठा धोका हा, की ही निष्क्रियता ध्यानात येण्यापूर्वीच यांतले काही अती उदास, हताश मनोरुग्ण आत्महत्याही करू शकतात.

याउलट गोऱ्या वंशात जवळजवळ दहा टक्के लोकांमध्ये असं एकही जनुक नसतं. अशा माणसांना कोडीनचा कितीही मोठा डोस पाजला तरी त्यांच्या दुखण्याला आराम पडत नाही. अशा माणसांना मॉर्फिनचं किंवा अफूचं व्यसनही लागत नाही. अशा निर्जनुक लोकांमध्ये औदासीन्यावरच्या, नॉरट्रिप्टिलीनसारख्या औषधांची समस्याही उलटी असते. CYP दादा नसला तर अशा औषधांचं काम कुणी थांबवतच नाही. कुठल्याही औषधाचं अती झालेलं काम म्हणजेच दुष्परिणाम. त्यामुळे अशा बिन-दादाच्या माणसांमध्ये औदासीन्यावरच्या औषधाचा सर्वसामान्य डोस दिलेला असतानाही दुष्परिणाम होतात.

शिवाय, या जनुकांमध्ये काही अक्षरपालट असतात. आपण जनुक-ठशांबद्दल बोलताना तानांमधल्या सा-रे-*ग*-रे-ग-म आणि सा-रे-*रे*-रे-ग-म अशा स्वरबदलांसारखे हे जनुकांमधले अक्षरबदल (SNPs किंवा snips) पाहिले होते. हेच ते genetic fingerprints ठरवणारे अक्षरबदल. हे बदल कुठे होतात त्यावरून दादाची वागणूक ठरते. कधी तो जहाल होतो, कधी मवाळ होतो, कधी वेगळ्याच पदार्थांवर काम करायला लागतो तर कधी कामधाम बंद करून संन्यास घेतो (निष्क्रिय होतो). हे निव्वळ CYP मध्येच घडतं असं नाही. नेहमी घेतल्या जाणाऱ्या औषधांच्या चालचलणुकीवर नियंत्रण ठेवणारी (enzymes) सुमारे पन्नास ते शंभर वेगवेगळी प्रथिनं सध्या माहीत आहेत. त्या प्रथिनांपैकी बहुतेकांमध्ये असा बहुविध जनुकाक्षर-पालट म्हणजेच genetic polymorphism आढळतो.

पूर्वी औषधांची चाचणी, उंदरांवर सर्रास केली जात असे. SNPsचा शोध लागल्यावर उंदरांचाही अशा जनुकपालटां-साठी तपास केला गेला. तेव्हा कळलं की उंदरांमध्ये या CYP2D6ची वेगवेगळ्या नऊ प्रकारची जनुकं असतात. आणि ती सगळीच्या सगळी कंबर कसून काम करतात. उंदरांचा आहार चौफेर असतो पण चौकस नसतो. ते मिळेल ते खात जातात. त्यामुळे अन्नातून येणाऱ्या अनेकविध अनपेक्षित विषांवर उपाय करायला रखवालदार प्रथिनांची नऊ प्रकारची दळं सतत सज्ज ठेवावी लागतात. मानवाचा आहार बुद्धीच्या वापरानं विषं टाळून निवडलेला, वेचक असतो. त्यामुळे यकृताला विषाविषयीची उठाठेव कमी करावी लागते. परिणामी, उत्क्रांतीचा भाग म्हणून, मानवात हे प्रथिनांचे विषशोधक रखवालदार अनावश्यक झाले आणि कमी होत गेले. इतके, की गोऱ्या वंशामध्ये तसं एकाच प्रकारचं जनुक टिकलं आणि त्यातही सुमारे दहा टक्के लोकांत तेही उरलं नाही.

दहा ते वीस हजार वर्षांपूर्वी इथियोपियाच्या भागात लोकसंख्या फोफावली. त्यामुळे अन्नाचं दुर्भिक्ष झालं. विषारी कंदमुळंही खाऊन गुजराण करावी लागली. त्या नव्या विषांशी झुंजण्यासाठी तिथल्या जमातींमध्ये CYP2D6 प्रथिनांमध्ये अनेक नवे अक्षरपालट झाले. त्यांचं polymorphic वैविध्य वाढलं.

नव्या औषधशास्त्राला हा जनुकीय भूगोल आणि अनुषंगानं जनुकीय वंशभेद सतत लक्षात ठेवावा लागतो. नवी औषधं तयार करताना हे भान ठेवलं जातं. भविष्यातली काही औषधं फक्त निर्जनुक गोऱ्यांसाठी आणि दुसरी काही बहुजनुकी इथियोपियनांसाठी बनवावी लागतील. त्यामुळे काही वेळा या नव्या जनुक-वैद्यकावर वंशद्वेषाचाही ठपका येईल. भविष्यात जिथे पर्याय असेल तिथे CYP2D6 वर अवलंबून असणाऱ्या औषधांना फाटाच दिला जाईल. त्यामुळे हळूहळू या प्रथिनाची औषधक्षेत्रातली दादागिरी कमी होत जाईल.

मुकादम (enzymes) प्रथिनांची ओळख करून घेताना सर्वात बड्या दादाशी जानपछान झाली. पण औषधांचं शरीरातलं वळण-वर्तन ठरवणारे इतरही अनेक मुकादम असतात. शिवाय औषधांचे कण रक्तात नीट वाहून नेऊन कामाच्या ठिकाणापर्यंत पोचवणारी वाहक-प्रथिनं (Transport proteins) असतात. त्याखेरीज आपल्या पेशींच्या आवरणावर काही वेगळी स्वागतक प्रथिनं (Recetors) असतात. औषधांच्या कणांशी हातमिळवणी करून त्यांचं पेशींत स्वागत करणं हे या प्रथिनांचं काम. या साऱ्यांतही polymorphism किंवा जनुक-वैविध्य असतं. उपचारांना येणारा गुण किंवा त्याचे होणारे दुष्परिणाम हे या 'पिण्डे पिण्डे भिन्न' असलेल्या जनुकतऱ्हांवर आणि त्यामुळे कमीअधिक काम करणाऱ्या प्रथिनांवर अवलंबून असतात.

औषधांचे दुष्परिणाम सभोवतालच्या परिस्थितीवरही अवलंबून असतात. वातावरणातलं प्रदूषण, मद्यपान, धूम्रपान, इतर आजार, त्यांच्यासाठी दिलेली इतर औषधं या साऱ्यांची संगत कुठल्याही औषधाला बाधक ठरू शकते. पण या दुष्ट संगतीची वाट बहुतेक वेळा मुकादम-वाहक-स्वागतक प्रथिनांच्या अड्ड्यावरूनच जाते. Erythromycin,

Ciprofloxacin सारखी ॲण्टिबायोटिक्स किंवा जठराच्या अल्सरवरचा Cimetidine हा उपाय हे सारे CYP2D6 मुकादम-प्रथिनाला आपल्याच सरबराईत गुंगवतात. त्यामुळे इतर औषधांवर मुकादमगिरी कमी होते. याउलट Phenytoin सारखे आकडीवरचे उपचार, शस्त्रक्रियेच्या वेळी दिली जाणारी भूल यांनी मुकादमाला अधिक काम करायला प्रोत्साहन मिळतं. शिवाय कुठल्याही औषधाची गोळी किंवा सिरप बनवताना त्यात दुसरे काही पदार्थ मिसळावे लागतात. काही दुष्परिणाम या इतर मिश्रितांमुळेही असतात.

या दुष्परिणामांशी जनुक-संबंध प्रथम जोडला गेला तो सुमारे साठ वर्षांपूर्वी. शस्त्रक्रियेच्या वेळी स्नायू तात्पुरते शिथिल करण्यासाठी दिलं जाणारं एक औषध त्याच काळात प्रथम वापरलं गेलं. त्याचा दुष्परिणाम होऊन काही रुग्ण तापानं फणफणून मेले. त्या अतिज्वराचा आनुवंशिकतेशी असलेला संबंध लक्षात आला. त्यानंतर टीबीच्या औषधानं हातापायांत येणारा सुन्नपणाही जनुक-लीलेचाच भाग असल्याचं समजलं. याचा मागोवा घेताघेताच CYP450 घराणं सापडलं.

सध्या एका रोगावर सर्वांसाठी एकच रामबाण उपाय ठरलेला असतो. रोगाचं निदान झालं, की जनुक-तपास न करता त्या अक्सीर इलाजाचा ठरलेला डोस सर्वांसाठी लिहायचा सरधोपट शिरस्ता आहे. त्यामुळे काही रुग्णांत गंभीर दुष्परिणाम होतात. हे औषधांच्या दुष्परिणामांचं प्रमाण मोठं आहे. पाश्चात्त्य देशांत दर वर्षी सुमारे सात टक्के लोक अशा त्रासानं आजारी होतात. अमेरिकेत दर वर्षी सुमारे एक लाख लोक औषधांच्या दुष्परिणामांनी मृत्युमुखी पडतात. याचा बोभाटा होतो आणि एरवी गुणी असलेल्या औषधांचं नाव मात्र बदनाम होतं.

भारतात घडणाऱ्या दुष्परिणामांची खात्रीलायक नोंद केलेला माहितीकोश सध्या अस्तित्वात नाही. घरगुती औषधं, जत्रेतल्या निनावी वैदूकडून घेतलेली जडीबुटी, झाडपाल्याची औषधं, असे अनेक उपचार आपल्या आपणच, कुणाच्याही सल्ल्या-शिवाय घेतले जातात. याची कुठेही लेखी नोंद नसते. यातल्या बऱ्याचशा औषधांना औषध मानलंच जात नाही. त्यामुळे नवी औषधं सुरू करताना आवर्जून चौकशी केली तरीही ते सांगितलं जात नाही. त्यामुळे कसलंही देशव्यापी सर्वेक्षण करून उपचारांच्या परिणामांची, फायद्या-तोट्याची टक्केवारी ठरवणं दुरापास्त आहे.

दुष्परिणामांची निदान हाकाटी होते. ज्या व्यक्तींमध्ये त्या औषधाला कामालाच लावलं जात नाही किंवा काम करू न देता निकामी केलं जातं, अशांना त्या उपचारानं नवा त्रास होत नाही. पण त्या निष्परिणामानं त्यांच्या मूळ आजाराला आरामही पडत नाही. सध्या बाजारात प्रचलित असलेली रक्तदाबाची दोन प्रकारची औषधं अदमासे तीस टक्के लोकांना गुण देत नाहीत. तर दम्यासाठी दिलं जाणारं एक नेहमीचं औषध जवळजवळ पन्नास-साठ टक्के लोकांमध्ये काहीही काम करत नाही. सध्या ही औषधं सरसकट दिली जातात. फायदा होत नाही हे कळेपर्यंत काही दिवस वाया जातात. मग औषध बदलून दिलं जातं. त्याचाही गुण आला नाही तर आणखी थोडे दिवस फुकट जातात. औषध योग्य ठरेपर्यंत पैसा आणि वेळ पाण्यात जातात. पटकन बरा होऊ शकला असता असा आजार दीर्घकाळ सतावत राहतो आणि याविरुद्ध फिर्यादही होत नाही!

कॅन्सरसारख्या रोगात रुग्णाची जनुककुंडली तर महत्त्वाची असतेच, शिवाय कर्करोगाच्या पेशींना स्वतंत्र जनुकटिप्पणी असते. स्तनाच्या कॅन्सरमध्ये HER2 हे जनुक ज्या बायकांच्यात अधिक व्यक्त होतं, त्यांना Herceptin हे एरवी प्रभावी असणारं औषध लागू पडत नाही, ते निष्प्रभ ठरतं. कॅन्सर फिरफिरून डोकं वर काढतो. त्यातून हा इलाज महागडा असतो. रक्तक्षय, पोटातले अल्सर असे त्याचे क्लेशदायक परिणाम बहुतेकांना भोवतात.

जशी कॅन्सरसारख्या रोगाची जनुकपत्रिका मांडता येते तसेच जीवाणू आणि विषाणू यांचेही जनुक-तपास केले तर लागण नेमक्या कुठल्या जातीच्या जंतूमुळे झाली आहे आणि त्याच्यावर नेमकी कुठली ॲण्टिबायोटिक्स उत्तम लागू पडतील हेही समजू शकेल. मग त्यातून रुग्णाच्या जनुक-प्रकृतीला सोसेल, मानवेल ते निवडता येईल. प्रतिबंधक लशी सध्या जंतूंच्या पेशींमधली प्रथिनं वापरून केल्या जातात. त्या ठरावीक तपमानालाच ठेवल्या नाहीत तर निकामी होतात. जंतूंचं RNA किंवा DNA वापरून जर लस तयार केली तर ती सहजासहजी निकामी होणार नाही. तिचा साठा करणं, भारतासारख्या देशात ती दूरच्या खेड्या-पाड्यांपर्यंत व्यवस्थित पोचवणं सोपं आणि बिनधोक होईल.

सध्या नवी औषधं तयार करताना एकच ठोकताळा वापरला जातो आणि सगळ्यांसाठी एकच औषध तयार केलं जातं. असं प्रत्येक नवं औषध माणसांना देण्यापूर्वी त्याच्यावर अनेक प्रकारच्या महागड्या चाचण्या केल्या जातात. इतका पैसा वापरल्यावर ते औषध लाखो-करोडो लोकांना दिलं गेलं तरच त्या कंपनीचा खर्च वसूल होतो. त्यामुळे जनुक-तपासणी करून त्या करोडोंच्या समाजाची वर्गवारी करायची कल्पना या कंपन्यांनी फेटाळून लावली. पण आता त्या कंपन्यांना नवं भान येत आहे.

कुठलंही नवं औषध साऱ्या पैसेखाऊ चाचण्यांच्या अग्निदिव्यातून पार पडलं, की मग त्याची सत्त्वपरीक्षा घेतली जाते. स्वेच्छेनं उमेदवार बनलेल्या काही थोडक्या माणसांना ते औषध दिलं जातं. त्यांना कसलाही त्रास न होता फायदाच झाला तरच ते औषध खुल्या बाजारात येऊ शकतं. पण अशा थोडक्या माणसांपैकी काहीजणांच्या पेशींत जर polymorphic दादा असले आणि परिणामी त्या उमेदवारांना मोठ्या प्रमाणात दुष्परिणाम झाले तर ते औषध बाद होतं. ती चाचणी असफल ठरवली जाते. तत्पूर्वीच्या सगळ्या महागड्या चाचण्यांचा पैसा पाण्यात जातो.

जरी योगायोगानं या टप्प्यापर्यंत सारं सुरळीत होऊन औषध बाजारात आलं, तरी कधी ना कधी ते या हटके-जनुकंवाल्या मूठभर माणसांना दिलं जातं. आणि अर्थातच त्यांच्यात त्याचे काही गंभीर परिणाम होऊ शकतात. जनुकांची कमतरता किंवा अति-कार्यक्षमता हे फार तर दहा टक्के लोकांत दिसून येतं. पण या वेगळ्या प्रकृतीच्या मूठभर मंडळीत काही गंभीर किंवा जीवघेणे दुष्परिणाम झाले की

कंपनीवर फिर्याद गुदरली जाते. नुकसानभरपाईत करोडो डॉलर्सचा चुराडा होऊ शकतो. त्यामुळे दुधानं पोळलेल्या औषधकंपन्या जराशी गंभीर तक्रार आली, की नवं औषध बाजारातून मागे घेतात.

अशामुळे ज्यांना त्या इलाजानं फायदाच झाला असता अशा सर्वसामान्य जनतेलाही ते गुणी औषध वापरता येत नाही. अनेक गुणकारी औषधं अशी कायमची बाद झाली आहेत. औषध बाद झालं म्हणजे त्याच्यावरचं सगळं रासायनिक संशोधन, प्रयोगशाळेत, प्राण्यांत आणि मग माणसांत केलेल्या सगळ्या चाचण्या यांच्यावरचा डोंगराएवढा खर्च वाया जातो.

अशा या व्यर्थ उधळणीमुळे गेल्या काही दशकांत औषधसंशोधनावरच्या खर्चाची कमान सतत चढतीच आहे.

नव्या जनुक-ज्ञानाचा फायदा इथूनच सुरू होतो. जनुक-विज्ञान महागडं आहे. पण त्याच्यामुळे उमेदवारांवर किंवा प्राण्यांवरही इलाज करण्यापूर्वी प्रयोगशाळेत जोपासलेल्या, भिन्न जनुकप्रकृतीच्या मानवी पेशींमध्ये नव्या औषधाची परीक्षा घेता येईल. ज्यांची मुकादम-प्रथिनं माणसांशी मिळतीजुळती आहेत अशाच प्राण्यांचा प्रयोगांसाठी वापर केला जाईल. स्वेच्छेनं उमेदवार होणारे लोक निवडताना आधी त्यांचा जनुक-तपास करता येईल. अशा रीतीनं सर्वसामान्य जनुकसमुदायाचेच उमेदवार निवडता येतील. मग त्यांच्यात दुष्परिणाम होणार नाहीत. नव्या औषधाचा निर्धोक फायदाच होईल. मग काही अनपेक्षित दोष तेवढे लक्षात येतील.

आजवर काही औषधांसाठी यातल्या काही पद्धती राबवल्या गेल्या. त्या अनुभवावरून काही वेगळंच लक्षात आलं. नव्या औषधनिर्मितीसाठी, औषधाच्या वापरासाठी नवं महागडं जनुक-विज्ञान वापरलं तर जो अधिकचा खर्च होईल तो असफल चाचण्या, बाद होणारी औषधं आणि कोर्ट-कचेऱ्या यांच्यात व्यर्थ नासणाऱ्या पैशांच्या एक साठांश इतकाच असेल.

या चाचण्यांसाठी प्रत्यक्ष जनुक-कुंडलीच मांडावी लागते असंही नाही. जिथे ती शक्य नसेल किंवा कठीण असेल तिथे वाहक-स्वागतक-मुकादम प्रथिनांची रक्तातली मात्रा मोजण्याचा पर्याय असतो. आणि त्यांचा कामसूपणा मापायला काही प्रातिनिधिक निरुपद्रवी पदार्थांचं मिश्रण (Pittsburg Cocktail किंवा Karolinska Cocktail) प्यायला देऊन त्यांची विल्हेवाट कशी लावली गेली ते मोजता येतं. पण जनुककुंडलीनं हे सारंच एका दमात तपासून होतं.

गेल्या काही दशकांत संगणकानं बरीच घोडदौड केली. त्याच्यावर जनुकशास्त्र स्वार झालं. त्यामुळे जनुकशास्त्राचीही झपाट्यानं प्रगती झाली. अकरा वर्षांपूर्वी क्रेग व्हेन्टरनं आपल्या स्वतःच्या जनुकसंचयाचा तपशील वाचला. त्या कामाला त्याला तेरा महिने आणि पाचशे कोटी रुपये लागले होते. आता तेच काम चार आठवड्यांत, पाच लाखांत होतं. आणि इ.स.२०१५ पर्यंत एका जनुकसंचयाचा नकाशा, त्याबद्दलच्या टीकाटिप्पण्यांसह, पंधरा मिनिटांत आणि पाच हजार रुपयांत मिळेल असा शास्त्रसंमत होरा आहे.

प्रत्येकापाशी अशा जनुककुंडल्या असल्या तर रुग्णाच्या वैयक्तिक तपशिलाचा सर्वांगीण विचार करूनच उपचार केले जातील. अदमासपंचे औषध न देता नेमकं लागू पडेलच असं, ज्या-त्या व्यक्तीसाठी सर्वोत्तम असं औषध पहिल्या फटक्यात अचूक मात्रेत दिलं जाईल. त्याला लागलीच गुण येईल. दुष्परिणाम कमीत कमी होतील. म्हणजेच अमेरिकेसारख्या देशात दर वर्षी एक लाख मृत्यू टळतील.

म्हणूनच संशोधकांना व्यक्तिगत वैद्यकशास्त्राचे (Personalised medicine) वेध लागले आहेत. एरवी मधुमेहासारख्या रोगाची चिन्हं दिसायला लागेपर्यंत शरीरात बरीच हानी झालेली असते. जनुककुंडली एकदा मांडली, की तिच्याबरोबरच्या टिप्पण्यांवरून आपल्याला भविष्यात कोणते रोग होऊ शकतात हे समजेल. नियमित वैद्यकीय तपास करून नोंदी ठेवल्या तर लक्षणं दिसण्यापूर्वीच, वेळच्या वेळी उपचार सुरू करता येतील. लहानपणीच राहणीमान बदलता येईल.

यामुळं संभाव्य रोगांचा धोका टाळता आला नाही तरी निदान ते आटोक्यात ठेवता येतील. हृदयविकाराची शक्यता असली तर प्राणिजन्य चरबी कमी खाणं, शारीरिक व्यायाम अधिक करणं, वजन वाढू न देणं हे प्रतिबंधक उपाय वेळीच योजता येतील. अल्झायमर्सचा धोका असा टाळता येत नाही. पण त्यामुळे खचून न जाता त्या भावी संकटासाठी निदान आर्थिक आणि मानसिक पूर्वतयारी ठेवता येईल. सध्या औषधाचा डोस व्यक्तीच्या वयावरून व वजनावरून ठरतो. जनुक-वैद्यकाच्या मदतीने तो शरीरातल्या प्रक्रियांच्या क्षमतेवरून ठरेल. त्यामुळे अधिक गुण येईल आणि अतिसेवन टळेल.

हे शास्त्र केवळ मानवापुरतं मर्यादित नाही.

मानवांमध्ये संसर्गजन्य रोग फैलावणाऱ्या माशांना आणि मच्छरांना मारण्यासाठी DDT हे कीटकनाशक वापरलं गेलं. या विषाशी लढायला या कीटकांनी आपल्या जनुकांमध्ये बदल केला. आता त्यांना DDT चांगलं मानवतं. त्यामुळे काही रोगांनी पुन्हा डोकं वर काढलं आहे.

मानवाच्या शरीरात शिरून रोग उत्पन्न करणारे अनेक जंतू-जीवाणू आहेत. त्यांची मुकादम-जनुकं अत्यंत शिकाऊ असतात. ती सतत गरजेपुरता जनुकाक्षर-पालट (polymorphism) करू शकतात. त्यामुळे त्यांच्या मुकादम-प्रथिनांना नवनवी ॲण्टिबायोटिक्स पचवायचं कसब साधतं.

आता मच्छरी, जंतू अशा ओळखीच्या शत्रूंना नेस्तनाबूत करायला त्यांच्या जनुक-पालटांपासून सावध राहणं जरुरीचं वाटतं आहे. गेल्या वर्षीच्या फ्लूच्या वराहावतारात अशा जनुक-परीक्षेचा फार मोठा फायदाही झाला आहे.

अशा रीतीनं मानवी आरोग्याची उद्दिष्टं ठरवताना समग्र सजीवांच्या जनुक-कुंडल्यांचा विचार करावा लागतो आहे. सजीव मित्रांसाठी DNA मंत्र आणि शत्रूंसाठी DNA शस्त्र वापरण्याचं कौशल्य वाढत चाललं आहे.

सर्रास जनुककुंडली करण्याचे, ती मिरवण्याचे आणि जिथे-तिथे वापरण्याचे काही तोटेही आहेत. भविष्यात होऊ शकणाऱ्या, जीवघेण्या किंवा अधू करणाऱ्या

आजारांचं जनुक-निदान आधीच कळलं तर काही जणांना फार दडपण येईल. त्यामुळे औदासीन्य, निरुत्साह बळावेल. शिवाय वैयक्तिक बाबींची गोपनीयता यामुळे धोक्यात येईल. ही कुंडली इतरांनाही समजली तर संभाव्य आजारांमुळे विम्याचे हप्ते वाढतील, नोकरी मिळताना अडचण होईल. म्हणून ती माहिती शक्यतो गुप्तच राखली जावी असा नियम करावा लागेल. किंवा संपूर्ण कुंडली न मांडता, ज्या-त्या औषधापुरत्या मर्यादित जनुक-चाचण्या तेवढ्या करून घेता येतील. पण हा ज्याचा-त्याचा वैयक्तिक प्रश्न राहील.

जनुक-कुंडली मांडणं सोपं, सर्रास आणि स्वस्त झालं तरी ते प्रत्येक माणसात वापरायचं असेल तर ते एक मोठं आव्हानच असेल. एक जनुक-संचय म्हणजे किचकट तपशिलाचा समुद्र असतो. बरेचसे डॉक्टर त्यात गटांगळ्या खातील. भारतासारख्या देशात हे ज्ञान खेडोपाडी पोचवणं आजघडीला तरी दुरापास्त वाटतं आहे. अगदी प्रगत देशांतल्याही लहानसहान गावांत ही अडचण आहेच. म्हणून त्या जनुक-गीतेची, ज्ञानेश्वरीहूनही सोपी गीताई व्हायला हवी. त्यातही मोठी अडचण म्हणजे प्रत्येक माणसाची दुसऱ्याहून वेगळी असणारी जनुक-गीता. त्या वैविध्यामुळेच तर हे सारं दुष्परिणाम-निष्परिणामांचं महाभारत घडतं आहे. प्रत्येकासाठी वेगळं भाषांतर कसं जमणार?

ही नड सर्वांत अधिक जाणवली ती औषधकंपन्यांना. त्यांनी गरजेपुरत्याच भाषांतराचा तोडगा काढला. Warfarin, Fluorouracil, Mercaptopurine वगैरे काही औषधांसाठी आता जनुकीय तपासण्या वापरल्या जातात. त्यांमध्ये त्या त्या औषधासाठी जबाबदार असलेल्या मुकादम-प्रथिनांची म्हणजेच enzymesची जनुकं तेवढीच तपासली जातात. त्या रास्त चाचण्या करायचा छापील सल्ला त्या औषधाबरोबरच दिला जातो. किंवा ही ठरावीक औषधं द्यायचा विचार असला तर आधी त्या प्रथिनापुरती जनुकतपासणी करून तिचा रिपोर्ट दाखवला, की मगच ते औषध दिलं जातं किंवा विकत घेता येतं.

अशा जनुक-तपासण्या करणाऱ्या लॅबोरेटऱ्यांशी औषध-कंपन्यांना रीतसर करार करावा लागतो. औषध-विक्रेत्यांनाही कायद्यानं बांधून घ्यावं लागतं. असा मर्यादित तपास त्यामानानं बराच स्वस्त होतो आणि औषध-कंपनीपासून डॉक्टर आणि रुग्णापर्यंत साऱ्यांच्याच आवाक्यातला राहतो. असा शिरस्ताच झाला की साऱ्यांनाच सोयीचं पडेल. रुग्णांना ही पद्धत शिकवणं आणि त्यांच्या जनुकांशी निगडित असलेली उपचारपद्धती मॅनेज करणं डॉक्टरांना सहज जमेल.

---

शिकंदर जग जिंकायला निघाला. पण त्याच्या हजारो वर्षं आधीच आदिमानवाने पृथ्वीचा कानाकोपरा पादाक्रांत केला होता आणि त्यावर कब्जाही केला होता. त्या साऱ्या इतिहासाची नोंद मानवाच्या DNA मध्ये जनुकांच्या भाषेत केली जात होती. अलीकडेच शास्त्रज्ञांना त्या 'अक्षर'गाथेचा अर्थ लावता आला. ती कहाणी रोमहर्षक आणि स्फूर्तिदायक तर आहेच. पण तिचं तात्पर्य प्रत्येकाने नीट समजून घेतलं तर आपल्या जागतिक कुटुंबाला या विश्वाच्या अंगणाचं नंदनवन बनवता येईल.

---

या तपासांनी दुष्परिणाम टळतील, पण ते जनुकवैविध्यवाल्या genetic polymorphism असलेल्या, माणसांना औषध न दिल्यामुळे टळतील ह्याचंही भान ठेवायला हवं. ज्यांच्यात हे दुष्परिणाम किंवा निष्परिणाम होतील हे समजतं त्यांनाही उपचारांची गरज असतेच ना! ज्यांच्यात HER2 अधिक व्यक्त होतं त्या कॅन्सरच्या रुग्णांनाही जगायची इच्छा असतेच! त्या मोजक्या माणसांसाठी वेगळी औषधं निर्माण करायचा महागडा खटाटोप करायला औषध-कंपन्या तयार नसतात. त्यांना प्रोत्साहन द्यायला अमेरिकेच्या सरकारनं त्यावरच्या करांमध्ये मोठ्या प्रमाणात सूट दिली आहे. जसजशी जनुक-तपासणी सोपी होत जाईल तसतसा नव्या औषधतपासणीचा खटाटोपही अधिकाधिक सुकर आणि स्वस्त होत जाईल. मग ही करमाफीची लालूच दाखवावी लागणार नाही.

ही नवी पद्धत अंगवळणी पडली, की सारी आरोग्यव्यवस्था बदलत जाईल. संशोधक, उद्योजक, आरोग्यखातं, औषध-विक्रेते, रुग्ण या साऱ्यांमध्ये वैयक्तिक वैद्यकाच्या संकल्पनांची जाण वाढेल आणि त्यांचा अधिकाधिक स्वीकार होईल. आजपासून चाळीस वर्षांनंतरचं चित्र वेगळंच असेल. लोक पूर्वी खिशात पानतंबाखूची चंची घेऊन हिंडत. सध्या मोबाइल असतोच. आता आधार-कार्ड असणार आहे. तसंच भविष्यात एक आरोग्य-कार्ड किंवा संगणकाची छोटी चकती असेल. तिच्यावर ज्याच्या-त्याच्या जनुकसंचयाचा तपशीलवार नकाशा असेल. कुठलंही नवं औषध घ्यायचं झालं, की ती चकती कुठल्याही संगणकात घालून सोबत त्या औषधाची माहिती जोडता येईल. औषध गुण देईल, त्रास देईल की फुकट वेळ खाईल हे उत्तर संगणकाकडून तत्काळ मिळेल.

संगणकबाप्पानं निवडून दिलेलं ते औषध कुणावरही अक्सीर इलाज करणारा रामबाण नसेल. ते औषध आणि तो डोस केवळ त्या माणसासाठी, त्याचे जनुकगुण पारखून, जनुककुंडलीतले आणि भोवतालच्या परिस्थितीतले छत्तीस गुण जुळवून ठरवलेला, खास असेल.

'जनुक-प्रकृती कसून पाहो। वैविध्याचा विचार राहो। मानवेल ज्या तो ते लाहो। मानवजात ।।' हे वैद्यकशास्त्राचं ब्रीदवाक्य होईल. छोट्या तारीगच्या मृत्यूपासून ज्या संशोधकांनी औषध-वैद्यकात जनुक-क्रांती घडवायचं व्रत अंगीकारलं आहे, त्यांचा वसा फळाला येईल. या 'औपचारिक' लढ्याची कहाणी सुफळ संपूर्ण होईल.

**- डॉ. उज्ज्वला दळवी**
ujjwalahd9@gmail.com

# माझं गाव माझं विद्यापीठ

**संतोष गवळे**

मी पुणे विद्यापीठात आलो ते, उच्च शिक्षण घेऊन पुण्यातच चांगल्या पगाराची नोकरी करावी म्हणून. मात्र माझ्याबाबत घडलं ते वेगळंच. पुणे विद्यापीठातून पत्रकारितेत पदव्युत्तर शिक्षण घेतल खरं, पण...

शेवटी, नोकरी न करता मी माझ्या गावी परत जाण्याचा आणि ग्रामविकासाची कामं करण्याचा निर्णय घेतला. मला अनेक प्रश्न पडले होते. गावात जाऊन कामं कोणती करायची? शिक्षण घेऊन नोकरी न करता गावात परतलो तर लोक काय म्हणतील? ज्या आई-बाबांनी रोजमजुरी करून शिक्षणाला पैसे पुरवले त्यांनी बघितलेल्या स्वप्नांचं, त्यांच्या अपेक्षांचं काय? एक ना अनेक....

पण माझ्या स्वत:च्या प्रश्नांपेक्षा मी ज्या गावात जन्मलो, लहानाचा मोठा झालो त्या गावाच्या समस्यांचं काय? असं मला वाटत होतं. गावात समस्या अनेक होत्या. त्यांचा अनेकांच्या आयुष्याशी थेट संबंध होता. ज्या समस्यांनी गावकऱ्यांचं जगणं असह्य व्हावं अशा समस्यांत गाव अडकलं होतं. त्या समस्या दूर कोण करणार? त्यासाठी आपण स्वत:ला गाडून घेतलं तर काय होईल? आणि तिथं उपयोगी ठरला 'निर्माण'चा मूलमंत्र- 'कर के देखो!' दुसरी बाब म्हणजे आपण शिक्षण घेतो ते कशासाठी? आपलं भलं व्हावं, आई-वडिलांचं स्वप्न प्रत्यक्षात उतरावं, आपल्या कुटुंबाला सुखसमृध्दीचं जिणं जगता यावं वगैरे वगैरे. पण मी माझ्या कक्षा अजून थोड्या रुंदावल्या.... माझ्या कुटुंबाप्रमाणे गावाला, समाजाला माझ्यासारख्या शिकलेल्यांची गरज आहे, असा विचार त्या निर्णयप्रक्रियेत महत्त्वाचा ठरला. परतीच्या त्या प्रवासात अभय बंग यांनी सुरू केलेल्या निर्माण या शिक्षणप्रणालीचा व युनिक फिचर्सचा मोठा वाटा आहे. मी त्यांच्या बरोबर फेलो म्हणून पाणीप्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्रभर फिरलो. अनेक अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, संस्था यांना भेटी दिल्या, आदर्श गावे बघितली. त्यामुळे नेमके प्रश्न कोणते व ते कसे सोडवता येतील यांविषयीची समज येण्यास मदत झाली.

आपल्या रोजच्या जगण्यात आजुबाजूच्या समस्या आपल्या अंगवळणी पडत जातात. पण आम्ही निर्माणप्रक्रियेत आजुबाजूला डोकावून पाहायला शिकतो. त्यामुळे समस्या जाणवू लागतात. त्या सोडवण्यासाठी आपण धडपडू लागतो आणि तेच माझ्याबाबत घडलं आणि मी पुण्यासारख्या शहरातील नोकरीच्या संधी सोडून माझ्या गावचा रस्ता धरला!

यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड तालुक्याहून पंचवीस किलोमीटर अंतरावर माझं गाव, मन्याळी. गाव दीड हजार लोकवस्तीचं. निसर्गानं भरभरून दिलेल्या जंगलालगत वसलेल्या माझ्या गावाला जाण्यासाठी नीट रस्ता नाही. पिण्याच्या तसंच शेतीच्या पाण्याची भीषण टंचाई. बेरोजगारी, व्यसनाधीनता, अनारोग्य अशा समस्यांची साखळीच! शिवाय प्रशासनाचं दुर्लक्ष. गावात जाऊन काय करावं? कोणत्या प्रश्नाला हात घालावा? गावातलं राजकारण, गटबाजी अशा विविध अंगांनी गावाचा अभ्यास सुरुवातीच्या दोन महिन्यांत केला. गाव समजून घेतलं. कोणतं काम हाती घेतल्यानं सर्वांचं सहकार्य मिळेल असा विचार केला आणि शासनानं सुरू केलेली घरपोच धान्य योजना गावात सुरू करण्याचा विचार गावकऱ्यांसमोर मांडला. त्यातून गावात घरपोच धान्य योजना



संतोष गावडे हा एकोणतीस वर्षांचा तरुण. आईवडिलांनी थोडीफार शेती आणि बाकी मजुरी करून संतोष आणि त्याच्या भावंडांचे शिक्षण केले. संतोष पुण्यात बी.ए.ला असताना गावातील प्रश्नांबाबत काम करण्याचा त्याने निर्णय घेतला. ऑगस्ट २०१० मध्ये तो गावी परतला. त्याच्या गावी परतण्याने त्याचे कुटुंबीय नाराज झाले. मात्र त्याच्या कामाचे वर्तुळ वाढीस लागल्याबरोबर घरच्यांनाही त्याच्या कामाचे महत्त्व पटू लागले. संतोषने 'निर्माण'मधील आपल्या सहकारी मुलीशी सामुहिक विवाह सोहळ्यात विवाह केला. हे जोडपे ग्रामविकासाठी कार्य करते. जर गावाचा विकास व्हायचा असेल, तर गावकऱ्यांनी स्वत:च्या पायावर उभे राहिले पाहिजे, असे संतोष सांगतो. सध्या गावकऱ्यांसाठी रोजगारनिर्मितीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी संतोष प्रयत्नशील आहे.

सुरू झाली. तीन महिन्यांच्या धान्याचं वाटप एकदाच पैसे भरून, पूर्ण धान्य चावडीवर आणून, सर्वांसमोर करायचं अशी ही योजना. त्यामुळे काळ्या बाजारात जाणाऱ्या धान्याला आळा बसला. कधी नव्हे एवढं धान्य गावात आलं आणि आमदार व तहसीलदार यांच्या हस्ते धान्याचं वाटप गावकऱ्यांना केलं गेलं. करताना अडचणी बऱ्याच आल्या पण महिला बचत गटांनी पैसे जमा करण्याची जबाबदारी स्वीकारल्यामुळे ते शक्य झालं. त्या निमित्तानं सर्व गट एकत्र आले आणि महिलांची ताकद माझ्या पाठीशी उभी राहिली. महिलांच्या आठवड्यातून दोन मीटिंग, तरुणांसाठी व्हॉलिबॉलचं ग्राऊंड, वाचनालय, विविध कार्यक्रमांचं आयोजन अशा अनेक कृतींतून गाव जोडायला सुरुवात केली. गाव एकत्र येत होतं तसं चार-दोन लोकांचा विरोधही तेवढ्याच जोमानं वाढत होता. कोणतंही काम हाती घेतलं तर विरोधक मंडळी त्यात आडपाय मारण्याचा प्रयत्न करत. पण आम्ही काम थांबवलं नाही. कारण मी एकटा नव्हतो. गाव माझ्या सोबत होतं.

भ्रष्टाचार थांबवण्यासाठी आपल्या-पासून प्रयत्न व्हावेत म्हणून आम्ही गावकऱ्यांनी धान्याबरोबर रॉकेलचा काळा बाजार गावपातळीवर थांबवण्याचा प्रयत्न केला. गावात रॉकेलचं वाटप सुरळीत होत नव्हतं. तरी कुठलीही तक्रार न करता आम्ही रॉकेल विक्रेत्याला चार वेळा विनंती केली, की शासकीय नियमाप्रमाणे रॉकेल देण्यात यावं. ते त्यांनी मान्य केलं नाही. त्यामुळे तहसिलदारास विनंती करून दुसऱ्या किरकोळ विक्रेत्याद्वारे गावात रॉकेलचं वाटप केलं. त्यावेळी तहसीलदार राजेंद्र जाधव यांची भूमिका महत्त्वाची ठरली. त्या सगळ्या प्रक्रियेत गावाला रॉकेल दोन महिने मिळालं नाही; तरीसुद्धा गावकरी या मतावर ठाम होते, की आम्हाला शासकीय दरात व शासकीय नियमानं रॉकेल मिळायला हवं. म्हणजे गावकऱ्यांनी आमच्या गावापुरता भ्रष्टाचार मोडून काढला. त्या दिवसापासून गावकऱ्यांनी भ्रष्टाचारमुक्त गाव असा जणू संकल्पच सोडला. लोकांना रॉकेल, धान्य मिळू लागलं तसं गावात सकारात्मक वारं वाहू लागलं. शिवाय, गावातल्या मीटिंगा, व्याख्यानं, चर्चा यांद्वारे लोकांना ग्रामविकासाची चाहूल लागली.

लोकांना पाण्याची टंचाई जाणवू लागली. गावातले हातपंप कोरडे पडले होते. लोकांना शेतातल्या विहिरीचं पाणी आणावं लागत होतं. विशेषकरून, महिलांना पाण्यासाठी जास्त त्रास सहन करावा लागत असे. दिवसभर शेतात राबायचं, सायंकाळी पाण्यासाठी भटकंती करायची. हा प्रश्न सोडवणं ही लोकांची गरज होती. 'निर्माण'मध्ये शिकलो होतो की 'आपल्या डोक्यातला किंवा आपल्याला वाटतो म्हणून त्या प्रश्नावर काम करायचं नाही. लोकांची गरज असेल तो प्रश्न हाती घ्यायचा.' पाणीप्रश्न सोडवण्याच्या दृष्टीनं गावात सर्वांची मीटिंग बोलावली. लोकांना पाणीप्रश्नावर काय करता येऊ शकतं असं विचारलं. लोकांच्या मते, गावात विहीर खोदली तर पाणीटंचाई दूर होऊ शकते.

'मग काय विहीर खोदण्यास सुरुवात करू' असं जमलेल्या सर्व गावकऱ्यांना मी म्हणालो.

काही म्हणाले हे शासनाचं काम आहे. तर काहीजण हसू लागले. काहींच्या मते, हे कसं शक्य आहे?

मी म्हणालो, 'सर्व गावानं मनावर घेतलं, कष्ट करण्याची तयारी दाखवली तर हे सहज शक्य होईल. गावातल्या प्रत्येक महिलेनं व पुरुषानं दोन दिवस विहिरीवर श्रमदान करायचं.'

महिला काम करायला तयार झाल्या! काम सुरू झालं. हळुहळू पुरुषही विहिरीवर कामाला येऊ लागले. जसजशी विहीर खोल खोदली जाऊ लागली, तसं लोकही उत्साहानं काम करू लागले. दिवसभर महिला तर रात्री तरुण मुलं काम करत. दीड महिन्यांत विहीर खोदून झाली. विहिरीला मुबलक पाणी लागलं. गावकरी खूष झाले. विहिरीसाठी प्रत्येकजण झटला होता. विहीर प्रत्येकाला आपली वाटत होती. दीड महिन्यात चला श्रमदान करायला असा शब्दच प्रचलित झाला.

माझ्यासाठी आनंदाची बाब म्हणजे विहिरीबरोबर 'श्रमदान' ही संकल्पना गावात रुजली. गावकऱ्यांनी दोन लाख रुपयांचं श्रमदान केलं तर 'निर्माण'च्या मुलांनी विहीर बांधायला दोन लाख रुपयांची मदत केली. विहिरीचा लोकार्पण सोहळा अभय बंग व आमदार विजयराव खडसे यांच्या हस्ते पार पडला. अशा तऱ्हेनं गावच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला. श्रमदान ही संकल्पना गावकऱ्यांच्या मनात रुजली.

दुसरं उदाहरण म्हणजे तरुण मंडळी रात्री गावातल्या विहिरीचं खोदकाम करत.



**विहिरीवर श्रमदान करताना महिला आणि पुरुष**



**श्रमदानातून खोदण्यात आलेल्या विहिरीचा लोकार्पण सोहळा अभय बंग, आमदार विजयराव खडसे, सरपंच अर्चना काळबांडे, संतोष गवळे यांच्या हस्ते पार पडला**

खोदकाम चालू असताना जंगलात आग लागल्याचं तरुणांच्या लक्षात आलं. वनपरिक्षेत्र अधिकारी, सामदेकर यांना माहिती देताच तेही रात्री अकरा वाजता आमच्या गावात हजर झाले. रात्रीच वीस-पंचवीस जणांचं टोळकं जंगलातील आग विझवण्यासाठी निघालं. रात्रभर जंगल विझवण्याचे प्रयत्न केले, तेव्हा सकाळी-सकाळी आग आटोक्यात आली. आगीनं जंगलाचं होणारं लाखो रुपयांचं नुकसान तरुणांच्या सहकार्यानं टाळता आलं! सामदेकर म्हणाले, ''लोक स्वत:हून जंगल विझवण्यासाठी तयार झाले ही बाब माझ्यासाठी अत्यंत आनंदाची आहे. लोकांना जंगल आपलं आहे आणि ते वाचवण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे ही जाणीव गावकऱ्यांत निर्माण झाली. अशी उदाहरणं फार कमी पाहायला मिळतात.''

विहीर पूर्ण झाल्यामुळे लोकांच्या विकासकामाबाबतच्या अपेक्षा वाढू लागल्या. पण आता एक अट घातली. ती म्हणजे प्रत्येकानं ग्रामपंचायतीचा कर भरावा. म्हणजे अजून विकासकामं करता येतील! आणि लोकांनी एवढ्या मोठ्या प्रमाणात सहकार्य केलं की पाच दिवसांत साठ टक्के वसुली झाली. ही सर्वांसाठी आश्चर्याची बाब होती, कारण गेल्या अनेक वर्षापासून लोकांनी कर भरला नव्हता. लोकांचा विश्वास संपादन केला की लोक सहकार्य करतात, कारण प्रत्येकाला विकास हवा असतो.

खेडेगावात शौचालयांबाबत अनास्था असते, तशी माझ्याही गावात होती. मी माझी मदत तुम्हाला हवी असेल तर तुम्ही आधी शौचालय बांधा. तरच मी मदत करीन अशी अट सहज बोलण्यातून लोकांच्या कानावर टाकत असे. पण उघड्यावर बसण्याची सवय व शौचालय बांधकामासाठी पैसे कुठून आणणार असा लोकांचा प्रश्न होता. शौचालय ही जेव्हा स्वत:च्या व गावाच्या आरोग्यासाठी महत्त्वाची बाब आहे असं लोकांच्या लक्षात येण्यास सुरुवात झाली तेव्हापासून लोकांनी तेही काम हाती घेतलं व गावात शौचालयांचं बांधकाम सुरू झालं. शौचालय बांधकामासाठी लागणारं विटा, सिमेंट, गिट्टी आदी सर्व साहित्य एकदाच खरेदी केलं आणि सगळ्यांनी ते वाटून घेतलं. त्या निमित्तानं सर्व गावकरी एक झाले. शिवाय, लोकांचा प्रत्येकी खर्चही कमी झाला.

हातभट्टीची दारू हा धंदा मोठ्या प्रमाणात गावात चालू होता. गावात दारू पिणाऱ्यांची संख्या बरीच होती. बाजूच्या गावचे लोकसुद्धा दारू पिण्यासाठी गावात येत. जेव्हा-जेव्हा महिलांच्या मीटिंग होत तेव्हा काही महिला दारूचा मुद्दा पोटतिडकीनं मांडत. घरात खायला काहीच नाही या चिंतेनं दिवसभर रानात राब-राब राबायचं आणि रात्री दारूड्या नवऱ्याचा मार खायचा, हे चित्र त्यांच्या बोलण्यातून स्पष्ट होई. पण दारुबंदीचा मुद्दा तेव्हा हातात घेणं उचित नव्हतं. कारण पुरुष मंडळी विरोधात गेली असती आणि माझी शक्ती विरोध दडपण्यातच पणाला लागली असती. म्हणून तो मुद्दा उशिरा हाती घेतला. त्यात ठाणेदार ज्ञानेश्वर देवकते यांनी महत्त्वाची भूमिका निभावली. गावात व तांड्यात महिला व पुरुष दारुबंदी समिती तयार केली गेली. समिती गावातल्या दारुड्यांवर व हातभट्टी पाडणाऱ्यांवर लक्ष ठेवे. गावात दारू पाडली जात आहे असं कळताच समितीतील सदस्य पोलिसांना कळवत. पोलिस गावात येऊन, शहानिशा करून संबंधित दारूविक्रेत्यावर गुन्हा दाखल करत. समितीतील सदस्यांचा दारुविक्रेत्यावर एवढा वचक निर्माण झाला की गावातील दारू बंद झाली! तांड्यामध्ये होळी हा सण मोठ्या प्रमाणात दारू पिऊन साजरा करण्याची रूढी आहे. काही लोकांना असं वाटलं, की सणाच्या दिवशी हातभट्टीची दारू पाडण्यास व पिण्यास परवानगी देण्यात येईल! पण ठाणेदारानं कल्पना मांडली, की 'त्या दिवशी दारूऐवजी दुधाचं वाटप केलं तर!'



**मन्याळी गावाची पाहणी करताना अभय बंग, विजयराव खडसे व संतोष गावडे**

.... आम्ही ती प्रत्यक्षात आणली व ठाणेदाराच्या हस्ते दुधाचं वाटप केलं. त्यामुळे होळीच्या दिवशी दारू नाही तर कधीच नाही असा संदेश गावकऱ्यांत पोचला.

त्याच दरम्यान, एका उद्योगपतीच्या मदतीनं गावात रोपवाटिका तयार केली. त्यामध्ये आम्ही चिंच, रेनट्री, आवळा, गिरीपुष्प, गुलमोहर, हादगा, बांबू, कडुलिंब, जांभूळ आदी प्रकारची पंचवीस हजार रोपं तयार केली. रोपं तालुक्यात मोफत वाटायला सुरुवात केली. लोकांनी त्यासाठीसुद्धा श्रमदान केलं.

धान्य-रॉकेलचा थांबवलेला भ्रष्टाचार, भ्रष्टाचारमुक्त गाव हा संकल्प, श्रमदानातून गावकऱ्यांनी खोदलेली विहीर, श्रमदानातून तयार केलेले रस्ते, अभय बंग यांची गावाला भेट, ग्रामपंचायतीची करवसुली, रोपवाटिका, शाळेत राबवले जाणारे विविध उपक्रम यामुळे मन्याळी गाव नावारूपाला आलं. गावास अमरावती विभागाचे विभागीय आयुक्त प्रवीणसिंह परदेशी, जिल्हाधिकारी श्रावण हर्डिकर यांनी भेट देऊन गावकऱ्यांचं कौतुक केलं.

मी गावाकडे परत जाण्याचा विचार केला होता तेव्हा गावात काय काय करता येऊ शकेल याचं प्लॅनिंग मनात होतं, त्यापेक्षा जास्त काम मी गावकऱ्यांच्या मदतीनं करू शकलो. गावासाठी काम करताना माझं शिक्षण होत गेलं. मी स्वत: बदलत चाललो आहे ही माझ्यासाठी फार मोठी गोष्ट आहे. नम्रता, सहनशीलता, प्रामाणिकपणा, सकारात्मक दृष्टिकोन यांसारखी जगण्याची अनेक मूल्यं मी शालेय व विद्यापीठीय शिक्षणात फक्त शिकत आलो होतो. ही मूल्यं माझ्यात रुजवण्याचं काम माझं गाव करत आहे. आणि म्हणूनच मी माझ्या गावाला 'माझं विद्यापीठ' मानतो.

**– संतोष रामदास गवळे**

मन्याळी, बित्तरगाव, तालुका उमरखेड,
जिल्हा यवतमाळ, पिन ४४५२०७,
भ्रमणध्वनी : ९७६७२१९०७३,
sgawale05@gmail.com

'व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन' ही एक अभूतपूर्व संस्था निर्माण करण्यात आलेली आहे. या संस्थेमार्फत 'थिंकमहाराष्ट्र डॉट कॉम' नावाचे वेबपोर्टल चालवले जाते. हे उद्याच्या महाराष्ट्राचे सांस्कृतिक व्यासपीठ आहे, असे वेबपोर्टलच्या एक वर्षाच्या अनुभवानंतर नि:शंकपणे म्हणता येते. साहित्य, कला, संस्कृतिसंचित, सामाजिक सेवेचे लहानमोठे उपक्रम आणि त्यांत गुंतलेली माणसे हे या व्यासपीठाचे लक्ष्य असणार आहे. महाराष्ट्रातील गावोगावच्या छोट्यामोठ्या नोंदी या वेबपोर्टलवर असणार आहेत आणि एका क्लिकवर अवघ्या महाराष्ट्राचे चित्र उभे करण्याची क्षमता या पोर्टलमध्ये येणार आहे. **दिनकर गांगल** हे या प्रकल्पाचे मुख्य संपादक आहेत.

यासाठी तालुकावार संस्कृतिसमन्वयक निर्माण करून महाराष्ट्रातील तीनशेपंच्याऐंशी तालुके त्यांच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांसाठी पिंजून काढले जाणार आहेत. पण हे सारे साध्य करायचे तर अर्थसाहाय्याची गरज आहे. ते तीन मार्गांनी उपलब्ध करून घ्यावे असा प्रयत्न आहे.

– दरवर्षाला तीनशे रुपये वर्गणी देऊन 'थिंकमहाराष्ट्र प्रकल्पा'चे आश्रयदाते सभासद बनणे.

– दहा हजार रुपये देणगी देऊन 'व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन'चे आधारस्तंभ बनणे.

– मोठ्या व्यक्तिगत व कॉर्पोरेट देणग्या आणि वेबपोर्टलसाठी जाहिराती मिळवणे.

('व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन' ही कंपनी कायद्याच्या 'कलम २५' नुसार ना नफा प्रायव्हेट लिमिटेड कंपनी निर्माण करण्यात आलेली आहे. तिचे जास्तीत जास्त पन्नास भागधारक होऊ शकतात. भविष्यकाळात या वेबपोर्टलला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व्यासपीठाचे खरोखर स्वरूप येईल तेव्हा या प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे रूपांतर पब्लिक लिमिटेड कंपनीत करण्याचा मानस आहे. ही अभूतपूर्व कल्पना आपल्या काळात निर्माण झाली व विकास पावली याबद्दल प्रत्येक मराठी माणसाला अभिमानच वाटेल!)

'व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन' या कंपनीतर्फे थिंकमहाराष्ट्र डॉट कॉम हे वेबपोर्टल आणि 'साने गुरुजी डॉट नेट' ही वेबसाईट चालवले जातात. त्यांपैकी 'थिंकमहाराष्ट्र डॉट कॉम' हे पोर्टल सतत विस्तार पावणारे आहे. फाउंडेशनतर्फे आणखी काही उपक्रमांना चालना देण्याचा प्रयत्न आहे :

- मराठी भाषा शिक्षणाचा ऑन लाईन अभ्यासक्रम, मुख्यत: इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकणारी मुले आणि परदेशीय भारतीय यांच्यासाठी.
- 'महाराष्ट्र २०२५' : व्हिजन डॉक्युमेंट बनवणे.

आपणास विंनती अशी, की वर उल्लेखलेल्या तीनांपैकी कोणत्याही तऱ्हेने 'व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन'ला साहाय्य करावे. चेक/ड्राफ्ट 'व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन' नावाने पुढील पत्यावर पाठवावा. आपण परस्पर पुढील बँक खात्यांमध्ये रक्कम जमा करू शकता. मात्र तसे ऑफिसला कार्ड टाकून वा अन्य मार्गे कळवावे, जरूर!

Cosmos Bank- Account no. 0121001015862,
State Bank of India – Account no. – 31759182464

'व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन', ३-वेणू अपार्टमेंट, बी.जे.देवरुखकर रोड,
'शिंदेवाडी' समोर, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४,
फोन नंबर (०२२) २४१८३७१०
thinkm2010@gmail.com

# वकिलीची आंतरराष्ट्रीय भरारी : ॲड. जयश्री सातपुते

**प्राचार्य मदन धनकर**

'कायदा म्हणजे बुद्धिनिष्ठ, विवेकी, सार्वत्रिक आणि शाश्वत अशी अधिसत्ता आहे' असं न्या. महादेव गोविंद रानडे म्हणाले होते. भारतातील सार्वजनिक जीवनात उपक्रमाचार्य म्हणून आदरानं मान्य न्यायमूर्तींच्या वचनाचा प्रत्यय, गेल्या वर्षी नवी दिल्ली येथे घडलेल्या घटनेनं दिला. दिल्लीत गजबजलेल्या रहदारीच्या मार्गावर लक्ष्मी नावाची बेघर महिला प्रसूत झाली. कुणीचीही मदत नसल्यामुळे बाळासह चार दिवस ती रस्त्यावर पडून होती. लोकांनी पायदळी तुडवल्यामुळं तिचा मृत्यू झाला. मात्र लक्ष्मीचं बाळ वाचलं. या घटनेनं अनेकांचे डोळे उघडले.

दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. ॲड. कु. जयश्री पुरुषोत्तम सातपुते एक वकील म्हणून उभ्या राहिल्या. घडलेली घटना लक्ष्मीच्या मानवाधिकाराचं उल्लंघन करणारी आहे हा जयश्रीनं उपस्थित केलेला मुद्दा न्यायालयानं ग्राह्य मानला. दिल्ली उच्च न्यायालयानं ऐतिहासिक निर्णय देऊन लक्ष्मीच्या मानवाधिकाराचे उल्लंघन झाल्याचं मान्य केलं. त्यातून दिल्ली प्रशासनानं निराश्रित, गरोदर व प्रसूत महिला आणि त्यांच्या नवजात बाळांसाठी निवासगृहं सुरू केली. निराधारांना कायद्यानं अधिकृत आधार देऊन मानवाधिकाराचं छत्र धरलं. हा निर्णय पुढे अनेक बाबींच्या स्थापनेचा आधार बनला.

या घटनेची नोंद लंडन येथील 'द गार्डियन' या विख्यात वृत्तपत्रानं घेतली. जागतिक महिलादिनाचं निमित्त साधून वृत्तपत्रानं जगातील शंभर प्रेरणादायी महिलांची नावं प्रकाशित केली. वैशिष्ट्यपूर्ण कार्यातून समाजाला दिशा देणाऱ्या शंभर महिलांत भारतातील पाच महिलांना स्थान



मिळालं. यात लेखिका अरुंधती रॉय, पर्यावरणवादी नेत्या वंदना शिवा, व्हाइट रिबन अलायन्सच्या अपराजिता गोगोई, ऑल वुमन व्हिजिलन्स फोर्सच्या समतापाल देवी आणि ॲड. जयश्री सातपुते यांचा समावेश झाला.

ॲड. जयश्री सातपुते यांनी व्यक्तिश: व त्यांच्या संघटनेच्या वतीनं केलेल्या युक्तिवादामुळे मानवाधिकाराची बूज तर राखली गेलीच, शिवाय कायद्याची पताका दिमाखानं फडकावली. कायदा म्हणजे सुरक्षित जीवन जगण्यासाठी दिलेली हमी. कायदा म्हणजे माणसाला व्यवहारात लाभलेलं कल्याणकारी कवच. व्यवहार नीट व सुरक्षित चालावं यासाठी परस्परांनी विचारपूर्वक घालून दिलेली शिस्त. लिखित कायद्याचं पालन करताना पारंपरिक जीवनातून आलेल्या अनेक अलिखित बाबींची अंमलबजावणी करावी लागते. ॲड. जयश्री सातपुते यांनी कायद्याचा वापर करून मिळवलेलं यश या पार्श्वभूमीवर लक्षात घेतलं पाहिजे.

भारतीय राज्यघटनेनं स्वातंत्र्य, समता व बंधुता यांच्या स्थापनेची ग्वाही देताना, कायद्याद्वारे मानवी हक्कांना संरक्षण देण्याचा विचार आदरपूर्वक स्वीकारला आहे. भारताच्या संविधानात व्यक्तीचे मूलभूत हक्क सुरक्षित ठेवणारी यंत्रणा उभारली आहे. समाजातील दुबळे घटक, स्त्रिया व अल्पसंख्य यांच्याबाबत विशेष जबाबदारी सरकारवर टाकली आहे. ॲड. जयश्री सातपुते यांनी दाखल केलेल्या याचिकेमुळे याबाबत सजग व आग्रही असलेल्या संस्था, कार्यकर्ते आणि विचारांना प्रतिष्ठा मिळाली आहे. रूढ मार्गानं जाणाऱ्या समाजमनाला अशा घटना व निकाल यांनी सकारात्मक प्रतिसाद मिळतो, बदलासाठी आश्वासक बळदेखील.

ॲड. जयश्री सातपुते यांचे वडील ॲड. पु.मा. सातपुते चंद्रपूर येथील नामवंत वकील आहेत. ग्रामीण जीवनातून आलेल्या या कुटुंबानं कष्टपूर्वक जीवनमार्ग स्वीकारला. ॲड. जयश्रीनं नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातून कायद्याची पदवी घेतली. आपल्या अध्ययनाला जागतिक परिमाण लाभावं म्हणून लंडन येथील सिटी युनिव्हर्सिटीतून एलएलएम केलं. मानवाधिकार विषयात तिचं स्पेशलायझेशन आहे. भारतात इतर उच्च न्यायालयांत अधिवक्ता म्हणून ती काम करत असून, युनायटेड नेशन्स हाय कमिशननं रिफ्युजींची सल्लागार म्हणून तिची नेमणूक केली आहे.

जयश्री सातपुते यांनी घसास लावलेले विषय व त्यांच्या अंमलबजावणीसाठी कायद्याच्या परिभाषेत मांडलेली बाजू यांची सर्वत्र प्रशंसा होत असल्यामुळे, अमेरिकेतील वॉशिंग्टन शहरात संपन्न जागतिक युवा अधिवक्ता परिषदेत भाग घेण्याची संधी त्यांना मिळाली. या परिषदेत जगातून सात महिलांना बोलण्यासाठी निमंत्रित करण्यात

आले होते. दरम्यान दक्षिण आफ्रिका व नायजेरिया या देशातील प्रमुख बार असोसिएशन्स व ओपन सोसायटीने ॲड. जयश्रीना निमंत्रण दिले. या ठिकाणी झालेली भाषणे व चर्चा यांत प्रामुख्यानं भारतातील न्यायालयात दाखल होणाऱ्या जनहित याचिका आणि सामाजिक, वैधानिक व समाज-विज्ञानाशी संबद्ध असलेले हक्क यावर चर्चेत भाग घेऊन जयश्रीनं आपल्या चौफेर व्यासंगाची साक्ष दिली. सूक्ष्म अभ्यास, अचूक संदर्भ देण्याची तत्परता व प्रभावी मांडणी यामुळे तिचं प्रतिपादन परिणामकारक ठरलं.

दक्षिण आफ्रिकेत भारतीयांची संख्या मोठी आहे. शिवाय महात्मा गांधींच्या वास्तव्याची पार्श्वभूमी असल्यामुळे विचारांचं आदानप्रदान जिव्हाळ्यानं होतं. विटोरिया विद्यापीठात जगातील सोशियो इकॉनॉमिक आधारावरील समाजचिंतन प्रगल्भ असून, अनेक देशांच्या वस्तुस्थितीचा संदर्भ घेऊन चर्चा झाली. याबाबत जयश्रीनं समाधान व्यक्त केलं. नायजेरिया व दक्षिण आफ्रिकेत संवेदना हरपून टाकणारं दारिद्र्य आहे. महिलांना आपले बाळंतपणासारखे स्वाभाविक देहधर्म पार पाडताना येणाऱ्या असंख्य अडचणी, मानवाच्या प्रगतीची कहाणी किती कर्णबधिर करणारी आहे, यावर जयश्री चर्चेत विस्तृत भाष्य करते तेव्हा क्षणभर आपण सुन्न होतो.

भारतात अलीकडे कायदेशीर लढा देऊन जयश्रीनं मिळवलेलं यश प्रगत समाजानं लक्षात घ्यावं असं आहे. स्थानिक स्वराज्य संस्था व सरकार यांचे, उपेक्षा कायम करणारे संवेदनशून्य धोरण, काळाच्या प्रवाहाला मागे लोटणारे आहे. याची कल्पना करणं कठीण आहे. अलीकडे नागालँडच्या उच्च न्यायालयात दाखल याचिकेवर जयश्रीनं मोठा विजयी कौल घेतला. राजधानी कोहिमा येथील उच्च न्यायालयात धाव घेऊन त्यांनी लढाई जिंकली. नागालँडमध्ये नगर परिषदांत महिलांना तीस टक्के आरक्षण आहे. परंतु गेल्या दहा वर्षांपासून नगर परिषद निवडणुका नाहीत. ही दुःखद परिस्थिती लक्षात घेऊन मदर्स संघटनेच्या महिलांच्या उपस्थितीत, जयश्रीनं सुमारे पाच तास युक्तिवाद केला. उच्च न्यायालयानं याचिका ग्राह्य ठरवून जानेवारीत निवडणुका घेण्याचा आदेश दिला. या निकालानं महिलांचं मनोबल उंचावलं. एवढंच नव्हे, तर भारतातील अनेक राज्यं, कार्यकर्ते व संघटना यांना नवी दृष्टी मिळाली.

भारतात गरोदर स्त्रियांचा मोठ्या प्रमाणावर मृत्यू होतो. अपुऱ्या वैद्यकीय सोयी व मार्गदर्शन आणि आरोग्यविषयक योजनांची गलथान अंमलबजावणी यामुळे गरोदर स्त्रिया, माता-भगिनी व बालकं यांचे होणारे अपमृत्यू कल्याणकारी राज्याचे ब्रीद कलंकित करणारे आहे. यासंबंधी जबलपूर उच्च न्यायालयात जयश्रीनं धाव घेतली. तीन वर्षांपूर्वी याच विषयावर सरकारकडून उत्तर आलं नाही. यावेळी मात्र राज्याकडून आवश्यक सोयींची तरतूद करण्याचा आदेश न्यायालयानं दिला. एवढंच नव्हे, तर केंद्र व राज्य सरकारला ताकीद देऊन दंड ठोकला. भारतात महिला व महिला संघटनांनी न्यायालयात धाव घेतली तर महिलांना अनुकूल व न्याय देणारे आदेश मिळतात, असा अभिप्राय ॲड. जयश्रीचा आहे.

चंद्रपूरच्या विद्या निकेतन इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जयश्री यांचं शिक्षण झालं. नागपूरला डॉ. आंबेडकर महा-विद्यालयातील प्राध्यापकांकडून उत्तम मार्गदर्शन व अध्यापनाचा लाभ झाला याची कृतज्ञतापूर्वक नोंद त्यांनी दिली आहे. लंडनमध्ये शिकत असताना एकूणच विषयाचा अभ्यास व संशोधनाला आंतरराष्ट्रीय आयाम लाभल्याचे त्यांना वाटते. विशेषत: विद्यार्थ्यांना न्यायालयीन कामकाजाचा परिचय तपशिलवार होतो. त्यामुळे विषयाचा तलस्पर्शी विचार करताना जगातील त्यासंबंधीचे कायदे व अंमलबजावणी याबाबत अद्ययावत माहिती मिळते. निम्न मध्यमवर्गीयांच्या गरजा व त्यांची पूर्ती यासाठी रोटरॅक्ट क्लबच्या माध्यमातून प्राप्त अनुभवामुळे आपल्याला खूप शिकता आले, याचा निर्वाळा जयश्री यांनी दिला आहे.

लंडन येथील सिटी युनिव्हर्सिटीत पदव्युत्तर अभ्यास करताना आपल्या अभ्यासाला चांगली दिशा लाभल्याचं त्यांनी नमूद केलं. लंडनमध्ये प्रत्येकाजवळ लॅपटॉप हमखास असतोच. भरपूर वाचन आणि स्वत:चं लेखन यांत वकील मोठ्या प्रमाणावर केवळ रुची दाखवत नाहीत तर भाग घेतात. पुस्तकापेक्षाही कधी कधी चर्चेवर अधिक भर दिला जातो. भारतातील व अन्य देशांतील वातावरण आणि परिस्थिती भिन्न आहे. भारतात गरिबी आहे. इंग्लंडमध्ये वंशवाद आणि अपंगत्वावर मात करण्यासाठी होणारे प्रयत्न व कायदे यांवर भर देण्यात येतो. इंग्लंडमधील प्राध्यापक न्यायालयात नियमित वकिली करतात. त्यामुळे अभ्यास व प्रत्यक्ष अनुभव यांची योग्य सांगड घालण्याची प्रक्रिया कायम राहते.

दिल्ली येथील न्यायालयात विस्थापितांना न्याय देण्याचा प्रयत्न होताना दिसतो. महिलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी न्यायालय व सरकार दक्ष आहे. गरिबांना देखील निवारा मिळाला पाहिजे या भावनेतून, घरासंबंधी चांगले आदेश देण्यात आले आहेत. घराची प्राप्ती हा देखील हक्क म्हणून विचारात घेतला जातो. ॲड. जयश्रीनी अल्पवयात आपले कायद्यावरील प्रभुत्व सिद्ध केले आहे. वडील यशस्वी वकील असल्यामुळे घरातील वातावरण कायद्याच्या अभ्यासास अनुकूल असल्यामुळे जयश्रीचे मनोबल सतत वाढत राहिले. त्यामुळे अभ्यास करताना किंवा न्यायालयात खटले चालवताना नेमकी भूमिका घेऊन त्यांना विवेक करता आला. ॲड. जयश्री सातपुते यांचे माहितीच्या अधिकारावरील कायद्याचे पुस्तक प्रकाशित असून, रेफ्युजीज्च्या कायद्यावरील पुस्तक प्रकाशनाच्या वाटेवर आहे. आपले अध्ययन, चिकाटी आणि कायद्याद्वारे महिलांना आणि वंचितांना न्याय मिळवून देण्याची तळमळ; यामुळे चंद्रपूरच्या जयश्री सातपुते कायद्याच्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर सहज येऊ शकल्या.

**– प्राचार्य मदन धनकर**
विद्यानगर,
गजानन महाराज मंदिर मार्ग,
चंद्रपूर-४२२४०१

# मदतीची साद घालणारी झाडे

## डॉ. सुजाता देशपांडे

एका एल्म (elm) नावाच्या झाडाची गोष्ट आहे ही. एक प्रकारचा पर्णभक्षक कीटक ह्या झाडाची पाने खरवडून आपली अंडी त्या पानांवर घालतो. या अंड्यांमधून काही दिवसांनी अळ्या बाहेर येतात. या अळ्या अतिशय भुकेल्या असतात व एल्मची पाने खातात. आपलं हे नुकसान मात्र हे एका जागी स्थिर असलेलं झाडं मुकाट्याने सोसत नाही. त्याला या पर्णभक्षकापासून दूर पळता येत नसले, त्याला हाकलता येत नसले तरी या झाडाला आपल्या काही विशिष्ट बचावकर्त्यांना हाक घालता येते! आता तुम्ही म्हणाल झाडाला बोलता कुठे येते? पण हाक काही फक्त ध्वनी वापरूनच देता येते असे नाही. एल्मच्या झाडासारखी रासायनिक हाकदेखील देता येते. पर्णभक्षकाने पान खरवडले की त्या पानाला जखम होते, ते पान प्रवर्तित (induce) होते व त्या पानातून विशिष्ट प्रकारची रसायने बाहेर पडतात. या रसायनांकडे आकर्षित होऊन काही विशिष्ट प्रकारच्या परजीवी (parasitoid) माश्या (flies) व गांधीलमाश्या (wasps) त्या पानांचा मागोवा घेत येतात. एल्मच्या संदर्भात एक परजीवी गांधीलमाशी येते. तेथे तिला त्या पर्णभक्षकाची अंडी सापडतात. ही परजीवी गांधीलमाशी त्या पर्णभक्षकाच्या अंड्यात आपली अंडी घालते. कालांतराने परजीवी गांधीलमाशीच्या अंड्यातून तिच्या अळ्या बाहेर पडतात व त्या पर्णभक्षकच्या अंड्याला फस्त करतात. त्यामुळे एल्मची पाने खायला पर्णभक्षकाच्या अळ्या राहताच नाही. अशारीतीने एल्म झाडाचा बचाव होतो.

वर सांगितलेली ही गोष्ट काल्पनिक नाही तर निसर्गात प्रत्यक्ष घडणारी आहे. त्यावर संशोधन होऊन शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत. साल २००० च्या आसपास ही घटना मानवाला ज्ञात झाली. अशा प्रकारचे हे सर्वात पहिले सापडलेले व सखोल अभ्यास झालेले उदाहरण. अशीच गोष्ट पाइनच्या झाडांबाबत होते, ब्रॉडबीन्स (Broad beans) व फ्रेंचबीन्स (French beans) यांच्याबाबतही घडते. प्रत्येक वनस्पतीचा पर्णभक्षक व त्याचा भक्षक वेगवेगळा. एल्म आणि पाइनच्या संदर्भात या झाडांवर अंडी घालताना झालेली जखम व त्याचबरोबर अंडी पानाला चिकटण्यासाठी पर्णभक्षक कीटकाच्या मादीच्या प्रजननसंस्थेतून आलेला द्रव, या दोहोंमुळे पाने प्रवर्तित होतात. बीन्सच्या संदर्भात अंडी व अळ्यांनी केलेली कुरतड या दोन गोष्टी पानांच्या प्रवर्तनासाठी आवश्यक असतात.


ब्रसेल्स स्प्राउट (Brussels sprout) या झाडाची गोष्ट जरा वेगळी आहे. याच्या पानांवर पिअरीसब्रासिसी (Pierisbrassicae) नावाचे फुलपाखरू पानाला कुठलीही जखम न करता आपली अंडी घालते. पान प्रवर्तित होते व रासायनिक हाक देते. मात्र ही हाक हवेत न सोडता पानाच्या पृष्ठभागावर राहते! मग गांधीलमाशी पानापर्यंत येणार कशी? अनेक मार्ग असू शकतात, की ज्यांचा शोध घेणे चालू आहे. मात्र कधी कधी ही गांधीलमाशी झाडाची हाक येण्याआधीच तिथे हजर होते, पर्णभक्षक फुलपाखरा-बरोबर! या फुलपाखराच्या मादीला नराबरोबरच्या मीलनातून शुक्राणू तर मिळतातच शिवाय या मादीचे दुसऱ्या कुठल्या नरासोबत मीलन होऊन पहिल्या नराच्या शुक्राणूंशी स्पर्धा होऊ नये म्हणून त्या पहिल्या नराकडून एक रसायनही मिळते. बेंझीलसायनाइड हे ते रसायन. यामुळे इतर नर त्या मादीकडे आकर्षित होत नाहीत, मात्र परजीवी गांधीलमाशी होते!! ही परजीवी गांधीलमाशी फुलपाखराच्या ज्या मादीला बेंझीलसायनाइड्चा वास येत असतो तिच्यावर स्वार होऊन पानांकडे येते. तेथे फुलपाखराने अंडी घातली की त्यात आपली अंडी घालण्याचेच काम फक्त परजीवी गांधीलमाशीकडे राहते.


मागील वर्षी जपानमध्ये मला एका संशोधन शिष्यवृत्तीद्वारे चहाच्या झाडांवर काम करण्याची संधी मिळाली. ॲडोक्सिफाएस होन्मई (Adoxophyes honmai) नावाचा एक पतंग चहाच्या झाडाच्या पानांवर अंडी घालतो व त्याच्या अळ्या पानांचे व पर्यायाने चहाच्या पिकाचे प्रचंड नुकसान करतात. मी आणि माझ्या जपानी प्रोफेसरने मिळून शोधले, की या अंडी घालण्यामुळे चहाचा पाने प्रवर्तित होतात. त्यांच्या पानांच्या पृष्ठाचे रासायनिक स्वरूप बदलते. या बदललेल्या स्वरूपाकडे एक परजीवी गांधीलमाशी आकृष्ट होते. आधी उल्लेखलेल्या ब्रसेल्स स्प्राउटप्रमाणेच चहाच्या पानांना पतंगाकडून अंडी घालताना जखम होत नाही. व प्रवर्तनानंतर पृष्ठावर आलेली रसायनेदेखील हवेत पसरत नाही. मग गांधीलमाशीला त्यांचा पत्ता कसा लागतो? गांधीलमाशी अंड्यांच्या शोधात झाडा-झाडांवरून उडत असते. पतंग जेव्हा

पानांवरून फिरत असतात तेव्हा त्यांचे खवले व विष्ठा आसपास पडलेली असू शकते. या गोष्टीदेखील गांधीलमाशीला आकर्षित करू शकतात. अशा गोष्टींचे अस्तित्व म्हणजे जवळपासच कुठल्यातरी पानांवर पतंगाच्या अंड्यांचे अस्तित्व असण्याची शक्यता. मग अशावेळी ती गांधीलमाशी पाना-पानाला स्पर्शून बघते. जेथे तिच्या स्पर्शिकांना त्या रासायनिक हाकेचा वास लागतो त्या पानाच्या मागच्या बाजूला किंवा जवळच्या पानावरच पतंगाची अंडी असतात व तेथे ती गांधीलमाशी पोहोचते.

वनस्पतीमध्ये फक्त पर्णभक्षकाची अंडी घातली गेल्यावरच रासायनिक हाक दिली जाते असे नाही. किंबहुना, या घटना ज्यांचा उल्लेख वर आला आहे त्या तशा नव्याने सापडलेल्या आहेत, गेल्या दहा बारा वर्षांत. मात्र त्याही आधी, साधारणपणे १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात, अळ्यांनी पाने कुरतडल्यावर दिल्या जाणाऱ्या रासायनिक हाकेची उदाहरणे ज्ञात होऊ लागली होती. यातील बऱ्याच घटनांचा सखोल अभ्यास झाला आहे व चालू आहे. झाडांच्या फक्त पानांवरच हल्ला होतो असे नाही. त्यांच्या बियांवर, मुळांवर देखील भक्षक टपलेले असतात. बिया व मुळांवर हल्ला झाल्यावरदेखील झाड मदतीची रासायनिक हाक देतात व या हाकेला 'ओ' दिली जाते. झाडे केवळ रासायनिक हाकच देतात असेही नाही. काही उदाहरणामध्ये असेही आढळले आहे, की झाडे त्यांच्या बचावकर्त्यांना राहायला जागा देऊन किंवा खायला घालूनही आपल्याजवळ बोलावतात. अशा रीतीने वनस्पती, पर्णभक्षक व बचावकर्ते (ज्यांमध्ये काही पक्षी, सूत्रकृमी (nematodes) आणि कीटक यांचा समावेश असतो) या अन्नसाखळीतील तीन वेगवेगळ्या स्तरावरील जीवांचा समावेश असलेली एक त्रिस्तरीय संस्था तयार होते. यातील रासायनिक हाक देणाऱ्या वनस्पती, पर्णभक्षक कीटक व त्या कीटकांवर उपजीविका करणारे परजीवी







**चित्र १. फुलपाखरावर स्वार झालेली मिलीमीटरएवढी गांधीलमाशी**
**चित्र २. फुलपाखराच्या गोलसर, ठिपकेदार डोळ्याखाली स्वार झालेली मिलीमीटरएवढी गांधीलमाशी**
**चित्र ३. चहाच्या पानावरील पतंगाची अंडी व त्यावर आपली अंडी घालणारी गांधीलमाशी**

कीटक या त्रिस्तरीय संस्थांचा अभ्यास जास्त प्रमाणात झाला आहे. अभ्यास केला जातो म्हणजे काय केले जाते? तर परजीवी कीटक पानांपर्यंत नेमके कसे पोहोचतात? पान नेमके कशामुळे प्रवर्तित होते? हाक घालणाऱ्या रसायनांचे स्वरूप काय? एकाच जातीच्या पर्णकीटकाने वेगवेगळ्या जातींच्या वनस्पतींवर अंडी घातली तर हाक घालणारी रसायने सारखीच असतात का? हे व इतर अनेक प्रश्न. यांचा जगात अनेक ठिकाणी अभ्यास सुरू आहे. जर्मनीतील प्रा. हिल्कर, नेदरलॅण्डमधील प्रा. डिके, जपानमधील प्रा. कायनोहे हे यातील आघाडीवरचे लोक. भारतातही काही कृषिसंशोधन संस्थांत याविषयी संशोधन चालते. अजूनही त्याविषयीच्या मूलभूत (basic or fundamental) जीवशास्त्रात बरेच काही करण्यास वाव आहे. केवळ मूलभूत जीवशास्त्रातच नाही तर व्यावहारिक (applied) जीवशास्त्रातही या अभ्यासाचा उपयोग आहे. कारण सूक्ष्मजीवांपासून ते मानवापर्यंत कैक सजीव वनस्पतींवर आपली गुजराण करतात. यात कीटक हे सर्वात महत्त्वाचे. साधारणपणे कीटकांच्या पाच लाख जाती ह्या वनस्पतींवर आपली भूक भागवतात. आणि याचे काही परिणाम आपल्यावरदेखील होतात. आपल्या पिकांवर होणारे कीटकांचे हल्ले, त्या हल्ल्यांना परतवण्यासाठी वापरली जाणारी कृत्रिम किंवा रासायनिक कीटकनाशके व त्यांचे मानवावर व इतर सजीवांवर होणारे भयानक परिणाम हे सर्वश्रुतच आहेत. या भयावह चक्राला छेद द्यायला या हाका घालणाऱ्या वनस्पती व त्या हाकांना उत्तर देणारे सजीव यांचा अभ्यास उपयोगी पडतो. आज भारतात व जगात अनेक ठिकाणी अशा बचावकारी कीटकाचा वापर करून पिकांचे रक्षण केले जाते. यात बचावकारी कीटकाची प्रयोगशाळेत पैदास केली जाते. गरजेनुसार या बचावकारी कीटकांची अंडी, अळ्या किंवा पूर्ण वाढ झालेले नर-मादी हे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना दिले जातात. शेतकरी ते शेतात सूचनेनुसार पसरवतात व आपल्या पिकांचा बचाव करून घेतात.यामधे कृत्रिम, रासायनिक कीटकनाशकांचा वापर करण्याची गरज पडत नाही. त्यामुळे ते फायद्याचे. आपल्या भारतात ही पद्धत सुरू झाली आहे. परंतु तिने अजून जोर धरला नाही. या पद्धतीत अजून संशोधन होणे आवश्यक आहे, तसेच तिचा प्रसार होणेही गरजेचे आहे. या दोन्ही गोष्टी एकमेकांना पूरक आहेत. एक वाढली की दुसरीही जोर धरेल. आशा ठेवू या, की नजिकच्या भविष्यात आपण रासायनिक कीटक-नाशकांच्या ऐवजी या त्रिस्तरीय संस्थांचा वापर करू.

**- डॉ. सुजाता देशपांडे**
d.sujata@gmail.com

RNI NO - 428 / 1987
RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001

ग्राहकों हेतु सेन्ट्रलाइट
Centralites for Customers

सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया
Central Bank of India
1911 पासून आपल्यासाठी "केंद्रित"

तुमचे घर आनंदाने उजळू दे,
तुमच्या सर्व मनोकामना परिपूर्ण होवु देत.

सणासुदीला वर्षाव सवलतींचा



• व्याज दरांमध्ये विशेष सूट • प्रक्रिया शुल्क नाही

डायरेक्ट हाऊसिंग फायनान्स लोन | सेन्ट पर्सनल गोल्ड लोन

सेन्ट ज्वेल | सेन्ट वेहिकल | सेन्ट सफर

पर्सनल लोन (कॉर्पोरेट/नॉनकॉर्पोरेट)

*नियम व अटी लागू

ही योजना फक्त मर्यादित कालावधीसाठी आहे

अधिक माहितीसाठी आमच्या वेबसाईट **www.centralbankofindia.co.in** वर लॉग ऑन करा किंवा संपर्क साधा 1800 200 1911 ( टोल फ्री )

'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.